https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २१५ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.२५ सप्टेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## चिप्सपासून जहाजांपर्यंत सर्व काही देशात बनवू

### पंतप्रधान मोदींच्या हस्ते नोएडात आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शनाचे उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नोएडा**

पंतप्रधान मोदी यांनी गुरुवारी नोएडा येथील इंडिया एक्स्पो मार्ट येथे यूपी इंटरनॅशनल ट्रेड शोचे उद्घाटन केले. त्यांनी व्यवसायांना सांगितले की त्यांना चिपपासून ते जहाजापर्यंत सर्व काही भारतातच तयार करायचे आहे. म्हणूनच, तुमचे व्यवसाय मॉडेल अशा प्रकारे विकसित करा जे स्वावलंबी भारताच्या उद्देशाला बळकटी देईल.



या बदलत्या जगात, एखादा देश जितका इतरांवर अवलंबून असेल तितकाच त्याचा विकास धोक्यात येईल. त्यामुळे, भारताला आता कोणावरही अवलंबून राहणे परवडणारे नाही. भारताने स्वावलंबी बनले पाहिजे. तत्पूर्वी, पंतप्रधानांनी व्यावसायिक नेत्यांशी चर्चा केली. मोदींनी निर्माते बोनी कपूर आणि त्यांचा मुलगा अर्जुन यांचीही भेट घेतली.

हा व्यापार प्रदर्शन २९ सप्टेंबरपर्यंत चालेल. रशिया भागीदार देश म्हणून सहभागी होत आहे. यावर्षीच्या व्यापार प्रदर्शनातून ५,००० कोटी रुपयांचा व्यवसाय होईल असा अंदाज आहे. पहिल्यांदाच, या प्रदर्शनात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) मॉडेलचा लाईव्ह डेमो आयोजित केला जाईल. उत्तर प्रदेशातील ४० जिल्ह्यांतील उत्पादने जागतिक व्यासपीठावर प्रदर्शित केली जात आहेत. २,४०० हून अधिक स्टॉल उभारण्यात आले आहेत. दररोज सकाळपासून रात्रीपर्यंत चर्चासत्रे आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील.

## अमरावतीच्या उड्डाण पुलावर अपघाताचा धोका

### एक्सपांशन जॉइंटमध्ये मोठी गॅप, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शहरातील ईर्विन-राजापेठ उड्डाण पुलावर गंभीर धोक्याची घंटा वाजली आहे. या पुलाच्या एक्सपांशन जॉइंटमध्ये चार ठिकाणी मोठ्या प्रमाणात गॅप निर्माण झाली असून, त्यामुळे अपघाताचा संभाव्य धोका निर्माण झाला आहे.



सध्या रेल्वे स्टेशन चौकातील उड्डाण पूल दुरुस्तीसाठी बंद आहे. त्यामुळे संपूर्ण वाहतूक ईर्विन चौकातील उड्डाण पुलावर वळवण्यात आली आहे. या पुलावरून दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर हलकी व जड वाहतूक सुरू असताना, एक्सपांशन जॉइंटमधील गॅपकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

या गॅपमुळे वाहनचालकांना अडथळा निर्माण होत असून, अचानक होणाऱ्या झटक्यांमुळे अपघात होण्याचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वार व रिक्षाचालक यांना याचा मोठा फटका बसत आहे. नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे.जर वेळेत योग्य कारवाई झाली नाही, तर गंभीर अपघातांना सामोरे जावे लागू शकते. प्रशासनाने तातडीने पावले उचलून पुलाची पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## ‘दादा, कर्जमाफी करा ना’; अजित पवार संतापले म्हणाले, आम्ही काय इथे गोट्या खेळायला आलोय का?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५देवगाव खुर्द**

दि.२५ महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. शेतीचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकऱ्यांकडून कर्जमाफी करण्याची मागणी केली जात आहे. परांडा तालुक्यात पुराचा फटका बसलेल्या गावाला भेट दिल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे एका शेतकऱ्यांने कर्जमाफीची मागणी केली. त्यावर ते संतापले. आम्ही काय इथे गोट्या खेळायला आलोय का?, अशा शब्दात त्यांनी सुनावले.

भूम परांडा मतदारसंघातील देवगाव खुर्द गावातील पूर परिस्थितीची उपमुख्यमंत्री अजित पवारांनी पाहणी केली. ग्रामस्थांशीही त्यांनी संवाद साधला. शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना धीर दिला.

'तुम्ही धीर सोडू नका, आम्ही सगळे तुमच्या पाठिंशी आहोत', असे म्हणत असतानाच एक शेतकरी म्हणाला, 'दादा, कर्जमाफी करा ना.' अजित पवार मागे बघत म्हणाले, 'याला करा रे मुख्यमंत्री.'

त्यानंतर बोलताना अजित पवार म्हणाले, आम्हाला कळतंय ना? आम्ही काय इथे गोट्या खेळायला आलोय? भावा सकाळी सहा वाजता करमाळ्यापासून काम सुरू केलं. जे काम करतं ना त्याचीच मारा, अशा शब्दात अजित पवारांनी नाराजी व्यक्त केली.

एवढं जीव तोडून सांगतोय. अजून पण एका ठिकाणी जायचं आहे. आम्हालाही कळतंय ना. आम्ही लाडक्या बहिणींना किती मदत करतोय. आज ४५ हजार कोटी रुपये वर्षाला मदत करतोय. शेतकऱ्यांची वीज माफी केली, २० हजार कोटी रुपये भरतोय, असे अजित पवार म्हणाले.

इथे माझा कार्यकर्ता बसलाय. याने मला काल रात्री कॉल केला आणि म्हणाला की, दादा, इथे परांडा-भूममध्ये असं असं झालंय. पाणी आलंय. लोक घाबरून गेली आहेत. तिथून मी सूत्रं फिरवली. मी तुम्हाला एक गोष्ट सांगतो. सगळी सोंग करतात येतात, पण पैशाचं सोंग करता येत नाही, असे सांगत अजित पवारांनी कर्जमाफी करण्याच्या मुद्द्याला पुन्हा बगल दिली.

## नुकसानग्रस्तांना मदत दिली जाईल, सर्व पंचनामे होणार:उद्धव ठाकरेंनी मीडियातून नव्हे, पत्र लिहून सूचना द्याव्यात - चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**

उद्धव ठाकरे यांचा सल्ला आम्ही ऐकला आहे. एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे जी काही मदत शेतकऱ्यांना द्यायची असते ती देणार आहोत. उद्धव ठाकरेंना जर काही सांगायचे असेल तर मीडियाच्या माध्यमातून नको, त्यांनी एखादे पत्र लिहून आपले म्हणणे मांडले पाहिजे. विरोधी पक्षाची जबाबदारी आहे सरकारला सूचना देणं सरकारकडे मागणी करणे. सरकार त्यांच्या मागणीचा करेल, असे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सकाळीच अकोल्याची ही बातमी मी पाहिली. त्यात काही शेतकऱ्यांच्या शेतात पाणी आले आहे. मंडळ अधिकारी म्हणत आहे की माझे शेत आहे माझी काही चूक नाही. या प्रकरणी विभागीय आयुक्तांना मी आत्ताच चौकशी करायला लावणार आहे, असे अकोला तालुक्यातील पडसोबळे महसूल मंडळाचे अधिकारी आहेत त्यांनी त्यांच्या शेतात बांध बांधला आहे आणि त्यामुळे जवळपास ३०० शेतकऱ्यांच्या शेतात चिखल आणि पूर परिस्थिती आहे, यावर प्रश्नावर बोलताना त्यांनी असे म्हटले आहे.

**मदतीचे वाटप सुरू**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मदत आणि



पुनर्वसनाच्या माध्यमातून जे वाटप करत असतो त्याचे वाटप सुरू करण्यात आले आहे. अनेक जण आपाआपल्या पद्धतीने मदत करण्याचा प्रयत्न करत आहेत. मला असा वाटते की आपत्ती आणि नुकसान फार मोठे आहे यातून मार्ग कसा काढता येईल हा महाराष्ट्र सरकारचा प्रयत्न आहे.

**सर्वच पंचनामे होणार**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, सोयाबीनचे पंचनामे सुरू करण्याचे आदेश दिलेले आहेत. सर्व नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सर्वच पंचनामे होणार आहेत. कोणीच असे म्हणू शकत नाही की हे पंचनामे होणार नाही. खरडून गेलेल्या जमिनीचे वेगळे पंचनामे करत आहोत, त्यांना पैसे देण्याचा वेगळा नॉर्म आहे. खरडून गेलेल्या जमिनी चांगल्या करण्यासाठी आम्ही शेतकऱ्यांना मदत करणार आहोत.

**उद्धव ठाकरेंनी पत्र लिहावे**

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी आमच्याही आमदारांनी १ महिन्यांचा पगार देण्याचा निर्णय घेतला आहे. या व्यतिरिक्त एनजीओ च्या सहाय्याने मदत देण्याचा प्रयत्न भाजपचे कार्यकर्ते करत आहेत. नागपूर, अमरावती मध्ये जे नुकसान झाले त्यांचे पंचनामे आम्ही करणार आहोत. याची पाहणी जिल्हाधिकारी करणार आहेत. उद्धव ठाकरेंचा सल्ला आम्ही ऐकला आहे, एनडीआरएफच्या नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना जी मदत द्यायची ती देणारच आहोत. उद्धव ठाकरेंनी मिडियाच्या माध्यमातून आपले म्हणणे मांडण्यापेक्षा एक पत्र लिहून मागणी केली पाहिजे.

## केवळ पर्यटनाला जाऊ नका, शेतकऱ्यांना काही मदत करा : एकनाथ शिंदे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

तकऱ्यांना संकटाच्या काळात मोठी मदत देणे अपेक्षित आहे. ज्यांना मदत द्यायची असेल त्यांनी मदत घेऊन नक्की शेतकऱ्यांच्या बांधावर जावे. मात्र, केवळ पर्यटनासाठी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊ नये, अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यावर टीका केली आहे. सध्या संकटाची वेळ आहे. अशावेळी ज्याला जेवढी शक्य आहे, त्याने तेवढी मदत देणे अपेक्षित आहे. मात्र विरोधक केवळ मदत देणाऱ्यांवर टीका करण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल पूरग्रस्त भागातील काही जिल्ह्यांचा दौरा करत पूरग्रस्त भागाची पाहणी केली होती. त्यानंतर आज उद्धव ठाकरे हे देखील पूरग्रस्त मराठवाड्यात पाहणी दौऱ्यासाठी येत आहेत. मात्र उद्धव ठाकरे यांच्या दौऱ्यापूर्वीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या दौऱ्यावर टीका केली आहे.

**फोटो पाहण्याऐवजी मदतीसाठी दिलेले साहित्य पहा**

काही लोक केवळ पर्यटनासाठी दौरा करत असल्याची टीका त्यांनी केली. आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी ज्या वस्तू देत आहोत, त्या बघा. त्यावरील फोटो कशासाठी बघता? असा प्रतिप्रश्न त्यांनी उपस्थित केला. कार्यकर्त्यांनी फोटो लावले असतील, पण ते पाहण्याऐवजी मदतीसाठी दिलेले साहित्य पहा. सध्या संकटातील शेतकऱ्यांना मदत देणे हे जास्त महत्त्वाचे आहे. कोणी कोणत्या पद्धतीने मदत दिली, यापेक्षा शेतकऱ्यांना मदत मिळणे हे जास्त महत्त्वाचे असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

**काही लोकांना विरोधी पक्ष नेते पदाचे पडले**

एकीकडे शेतकरी संकटात आहे. अशावेळी राज्य सरकार आणि सर्वच मंत्री शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी त्यांचे दुःख समजून घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. तर दुसरीकडे काही लोकांना विरोधी पक्ष नेते पदाचे पडले असल्याचे एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्यावर देखील निशाणा साधला. सरकार विरोधी पक्षनेतेपद देत नसल्या वरून संजय राऊत यांनी काल राज्य सरकारवर टीका केली होती. यावर एकनाथ शिंदे यांनी संजय राऊत यांच्यावर पलटवार केला आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील गाडीत बसण्याचा प्रयत्न चालकाने पुढे नेली, नरेंद्र पाटील खाली पडले, किरकोळ दुखापत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आजच्या नवी मुंबईतील एका कार्यक्रमावेळी दोन घटना घडल्या आहेत. फडणवीस यांच्या भाषणावेळी एशियन पेंट कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी उभे राहून मोठ्या आवाजात आपल्या मागण्या सांगण्यास सुरुवात केली. यानंतर लगेचच सिडकोच्या घरांच्या किमती कमी करा म्हणून फलक दाखवले. यानंतर कार्यक्रम संपवून फडणवीस वाहनात बसल्यानंतर त्यांची भेट घेऊन फडणवीसांच्या ताफ्यातील दुसऱ्या वाहनात बसण्याचा प्रयत्न करणारे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील खाली कोसळल्याची घटना घडली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाषणावेळी गोंधळ घालण्यात आला. आधी एशियन पेंट कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी उभे राहून मागण्या केल्या. यानंतर नवी मुंबईतील काही नागरिकांनी सिडकोच्या घरांच्या किमती कमी करा म्हणून फलक दाखवले. यामुळे काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. यावर फडणवीस यांनी आपल्या सर्व



मागण्या आणि घरांच्या किंमती बाबत योग्य निर्णय घेऊ, असे आश्वासन दिले.

तर कार्यक्रम स्थळावरून पुढच्या दौऱ्याला जात असताना मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यातील कारमध्ये बसताना नरेंद्र पाटील खाली कोसळले. मुख्यमंत्र्यांची भेट घेतल्यानंतर ताफ्यामदील दुसऱ्या गाडीत बसण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून करण्यात आला. मात्र, चालकाने गाडी पुढे नेल्याने तोल जात नरेंद्र पाटील खाली पडले. या घटनेत पाटील यांना किरकोळ दुखापत झाली आहे.

## २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार

### मराठवाडा, विदर्भात अतिवृष्टीची शक्यता; पुढील पाच दिवस राज्यासाठी संकटाचे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई**

हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, २५ सप्टेंबरपासून २९ सप्टेंबरपर्यंत राज्यात पावसाचा जोर कायम राहणार आहे. विशेषतः २७ सप्टेंबर रोजी मराठवाडा आणि विदर्भात अतिवृष्टीची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसाची तीव्रता आणखी वाढण्याचा अंदाज आहे.

याशिवाय कोकण, खानदेश आणि पश्चिम महाराष्ट्रातही पावसाची संततधार सुरू राहील, असा इशारा देण्यात आला आहे. पुढील काही दिवस राज्यात मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यांचा सामना करावा लागू शकतो. यामुळे प्रशासनाने सर्व जिल्ह्यांना सतर्कतेचे आदेश दिले असून नागरिकांनी बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे.

महाराष्ट्रावर पुन्हा एकदा पावसाचा कहर दिसून येत आहे. राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नद्या-नाले तुडुंब भरून वाहत आहेत, तर अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. खरीप हंगामाच्या शेवटच्या टप्प्यात आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांच्या आशेवर पाणी फिरले आहे.



जालना, बीड, लातूर, धाराशिव, परभणी यांसह मराठवाड्याच्या बहुतांश भागात उभी पिकं पाण्याखाली गेली आहेत. विदर्भातील कापूस आणि सोयाबीन पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. नागरिकांना पुरामुळे सुरक्षित स्थळी हलवण्याची वेळ आली असून शाळा, मंदिरे आणि ग्रामपंचायत कार्यालयं तात्पुरत्या निवाऱ्यांमध्ये बदलण्यात आली आहेत. या अनिश्चित पावसामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत आणि त्यांचा हंगाम वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

**पुढील पाच दिवस राज्यासाठी अत्यंत संकटमय**

हवामान खात्याने स्पष्टपणे सांगितले आहे की, पुढील पाच दिवस राज्यासाठी अत्यंत संकटमय ठरणार आहेत. त्यामुळे प्रशासनाला सतर्क राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जनतेला सुरक्षित ठिकाणी राहण्याचं आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या पिकांचे आणि जनावरांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे सांगण्यात आले आहे. राज्य सरकार आणि केंद्र सरकारने मिळून या संकटावर तातडीने उपाययोजना करणे, शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देणे आणि मच्छिमारांना आर्थिक मदत देणे हीच काळाची गरज आहे. पावसाने राज्यभरात आणखी हाहाकार माजवू नये यासाठी प्रशासन आणि जनतेनं एकत्रितपणे सज्ज राहणे आवश्यक आहे.

संपादकीय ......

# रंगीबेरंगी नवरात्र!

घटस्थापना झाल्यापासून म्हणजेच पहिल्या माळेपासून बाजारामध्ये दररोज वेगळ्या रंगांच्या साड्या किंवा ड्रेस घालून महिलावर्ग मिरवताना दिसत आहे. मला एक सांग, नवरात्राच्या कोणत्या दिवशी कोणत्या रंगाची साडी वापरायची, याविषयी पुराणात काही लिहिलेले आहे काय?

अजिबात नाही. कोणत्याही पुरातन ग्रंथामध्ये असा कोणताही उल्लेख नाही. गेल्या दहा–पंधरा वर्षांत हे काहीतरी, कुठून तरी आले आणि प्रसरण पावलेले म्हणजेच व्हायरल झालेले आहे.

तसं नाही, ज्या दिवशी जो रंग असेल तो रंग सगळीकडे दिसला की, ओळखायचे की हाच रंग आजच्या दिवसाचा आहे. बसमध्ये जा, लोकलमध्ये जा, बँकेत , शाळेत किंवा मेट्रोमध्ये जा! ज्या दिवशी निळा रंग आहे त्या दिवशी संपूर्ण समाज निळ्या रंगात भरून गेल्यासारखा दिसतो. अर्थात, महिलांना त्यामुळे दररोज नवीन रंगाची झाडी नेसून मिरवण्याचा योग येतो, हेही महत्त्वाचे आहे.

दुर्गाउत्सव किंवा घटस्थापना ते दसरा हे शारदीय नवरात्र असते. हा खरे तर स्त्री शक्तीला वंदन करण्याचा उपक्रम आहे. आपल्या पुराणांमध्ये आणि इतिहासामध्ये स्त्रियांचा मोठाच सन्मान केलेला आहे. या रंगीबेरंगी साड्यांच्या निमित्ताने बाकी कुणी असो की नसो; परंतु महिलावर्ग या काळात अत्यंत उत्साहात असतो, हेही महत्त्वाचे आहे.

आणखी एक अशीच गंमत परवा झाली. विषय असा आहे की, दसर्याच्या दिवशी रामाने रावणाचा वध केला किंवा पांडवांनी शमीच्या झाडावर ठेवलेली शस्त्रे खाली काढली आणि महाभारताला सुरुवात झाली. रामाने रावणाला मारले असेल; परंतु यामध्ये दसर्याच्या दिवशी गाड्या म्हणजेच मोटारसायकल, कार धुण्याचा काय विषय येतो, असा बिनतोड सवाल एकाने मला केला.

अरे, असे काही नसते. दसर्याच्या निमित्ताने सर्वत्र स्वच्छता होत असते. घरेदारे स्वच्छ केली जातात आणि रंग लावून उजळून टाकली जातात. स्वच्छता असेल, तर रोगराई दूर राहते म्हणून दसर्याला स्वच्छतेचे काम काढले जाते. तसेच गाडी स्वच्छ करण्याची प्रथा कधीतरी सुरू झाली असेल. ती काही मूळ दसर्याच्या कथेशी संबंधित नाही; परंतु दसर्याच्या निमित्ताने स्वच्छता होत असेल, तर काय हरकत आहे, असे माझे म्हणणे आहे. रोज रंगीबेरंगी साड्या घालायला मिळतात म्हणून महिलावर्गामध्ये येणारा उत्साह असो किंवा वॉशिंग सेंटरवर रांगा लावून गाड्या स्वच्छ करणे असो, दसर्याच्या निमित्ताने जसे घरदार, गाडी स्वच्छ होते, तसेच माणसांची मनेही स्वच्छ होतील, तर फार चांगले होईल, हे निश्चित!

# महिला सक्षमीकरणासाठी राणी दुर्गावती योजनेत अर्ज करण्याची संधी वाचा सविस्तर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

भारताच्या इतिहासातील शूर, बुद्धिमान आणि देशभक्त राणी राणी दुर्गावती यांच्या नावावर महाराष्ट्र सरकारने आदिवासी महिलांसाठी 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजना सुरू केली आहे.

राज्य शासनाने आदिवासी महिलांसाठी सुरू केलेल्या 'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजनेअंतर्गत वैयक्तिक व्यवसायासाठी ५० हजार आणि सामूहिक व्यवसायासाठी ७.५ लाख रुपये पूर्ण अर्थसाहाय्य मिळणार आहे.

या योजनेमुळे महिलांना स्वावलंबी होण्याची संधी मिळणार असून शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य आणि आर्थिक सक्षमीकरणावर भर दिला गेला आहे.

**काय आहे राणी दुर्गावती योजनेचा उद्देश?**

'राणी दुर्गावती आदिवासी महिला सक्षमीकरण' योजना ही महाराष्ट्रातील आदिवासी महिलांना सर्वांगीण सक्षम करण्यासाठी आखली आहे.

या योजनेतून शिक्षण, कौशल्यविकास, आरोग्य व पोषण, आर्थिक स्वावलंबन, शासकीय योजनांचा लाभ, बचतगटांचे बळकटीकरण यावर भर दिला आहे.

**योजना कोणासाठी?**

**लाभार्थी:** महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीतील महिलांना.

**अर्जदाराची अट:** अर्जदार स्त्री असावी.

या योजनेअंतर्गत महिलांना वैयक्तिक आणि सामूहिक व्यवसायासाठी आर्थिक सहाय्य मिळेल.

**वैयक्तिक योजनांसाठी सुविधा**

वैयक्तिक व्यवसायासाठी ५० हजार रुपयांपर्यंत १००% अर्थसाहाय्य

यात शाळा–शिक्षण, कौशल्य विकास, आरोग्य व पोषण, बचतगटांचे बळकटीकरण यांसह अनेक बाबींचा समावेश

**वैयक्तिक व्यवसाय कोणते?**

शिवणकाम यंत्र

भाजीपाला गाडी

ब्युटी पार्लर

**पत्रावळी बनवणारी यंत्रणा**

सामूहिक योजनांसाठी सुविधा

आदिवासी महिलांनी एकत्र येऊन सामूहिक व्यवसाय उभारल्यास सरकारकडून ७.५ लाख रुपयांपर्यंत अर्थसाहाय्य

**सामूहिक व्यवसाय कोणते?**

मसाला कांडप यंत्र

आटा चक्की

दुग्ध संकलन केंद्र

शुद्ध पेयजल विक्री केंद्र

बेकरी उत्पादन युनिट




नाश्ता केंद्र

इतर योजनांसोबत एकत्रित लाभ

राणी दुर्गावती योजना इतर सरकारी योजना (महिला व बालकल्याण, कृषी, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय) सोबत लाभ घेता येणार आहे.

**उदाहरणार्थ**

रुग्णालय रिक्षा

(गुलाबी सुरक्षा योजना)

शेळी/मेंढी वाटप योजना

दुग्ध व्यवसायासाठी जनावरे

स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शिका

**एकात्मिक कुक्कुट विकास योजना**

कृषी सिंचन उपकरणे व सौरपंप

मासेमारी साधने खरेदी

**अर्ज प्रक्रिया**

अर्ज आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प कार्यालयात करता येईल

वैयक्तिक योजनेसाठी जात प्रमाणपत्र आवश्यक

सामूहिक योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे अनिवार्य

वैयक्तिक योजनेसाठी कागदपत्रे

जात प्रमाणपत्र (Caste Certificate) – अर्जदार आदिवासी महिला असल्याचे प्रमाणपत्र.

ओळखपत्र (Identity Proof) – आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र आदी.

पत्ता प्रमाणपत्र (Address Proof) – आधार कार्ड, वीज बिल, बँक स्टेटमेंट आदी.

**बँक खाते माहिती –** आर्थिक सहाय्यासाठी बँक खाते तपशील आवश्यक.

**व्यवसायाची माहिती / योजना सादरीकरण –** अर्ज करताना व्यवसायाची संकल्पना, खर्च अंदाज व अपेक्षित लाभ याचा तपशील.

सामूहिक योजनांसाठी (Group/SHG) कागदपत्रे

जात प्रमाणपत्र – प्रत्येक सदस्यासाठी किंवा गटाच्या प्रतिनिधीसाठी.

गटाची नोंदणी कागदपत्रे (SHG / Cooperative Registration)

बँक खाते माहिती (Group Bank Account) – आर्थिक सहाय्यासाठी.

व्यवसाय प्रस्ताव / व्यवसाय योजना – सामूहिक व्यवसायाचा तपशील, खर्च अंदाज, अपेक्षित उत्पन्न.

सदस्यांची यादी (List of Members) – नाव, वय, पत्ता, ओळखपत्र क्रमांक.

**योजना का महत्वाची आहे?**

आदिवासी महिलांचे जीवनमान उंचावणे

आर्थिक स्वावलंबन निर्माण करणे

कौशल्य विकास व सामाजिक सशक्तीकरण

या योजनेमुळे आदिवासी महिलांना स्वयंपूर्ण आर्थिक आणि सामाजिक स्वावलंबनाचा मार्ग खुला होईल आणि त्यांच्या जीवनमानात लक्षणीय सुधारणा होईल.

# रेल्वे पुलाबाबत आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाचे निर्देश

## संयुक्त पथकाचा पाहणी अहवाल गुरूवारपर्यंत मागविला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती,**

: शहरातील राजकमल रेल्वे उड्डाणपूल वाहतुकीसाठी असुरक्षित घोषित करण्यात आल्यानंतरही, त्याखालून रेल्वे वाहतूक सुरू असल्याने संभाव्य धोक्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाने तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आशिष येरेकर यांनी हे आदेश जारी केले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या आदेशामध्ये रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी पथकाद्वारे पुलाची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. यासाठी रेल्वे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी एक संयुक्त पाहणी पथक तात्काळ स्थापन करावे. या पथकात पुलाला असुरक्षित घोषित करणाऱ्या स्ट्रक्चरल कन्सल्टंटचा ही समावेश करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. हे पथक रेल्वे वाहतुकीला असलेल्या धोक्याचे मूल्यांकन करून पुलाच्या संरचनेची सद्यस्थिती तपासणार आहे. पुलावरून वाहतूक बंद असली तरी पुलाखालून रेल्वे वाहतूक सुरू असल्याने पुलाला सुरक्षित करेपर्यंत किंवा तो पाडण्यात येईपर्यंत रेल्वे वाहतूक थांबवणे, वळवणे किंवा नियंत्रित करण्याची तातडीची गरज असल्याबाबत



पथकाने अहवाल देणे आवश्यक आहे. हा संयुक्त पाहणीचा अहवाल आणि शिफारशी दि. २५ सप्टेंबरपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे. सदर आदेशानुसार रेल्वेसाठी निर्देश देण्यात आले आहे. यात संयुक्त पाहणीमधील शिफारशीनुसार रेल्वे वाहतूक थांबवणे, वळवणे किंवा नियंत्रित करणे, पुलाचे गर्डर्स आणि सुपरस्ट्रक्चर नियंत्रित आणि सुरक्षित पद्धतीने पाडण्यासाठी कृती आराखडा तयार करून तो २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत सादर करणे, पुलाचे काम होईपर्यंत प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सर्व गाड्यांना वेगमर्यादा लागू करणे, संरचनेतील कोणत्याही बदलांवर लक्ष ठेवण्यासाठी पूर्ण वेळ देखरेख कर्मचाऱ्याची नेमणूक करणे, वास्तविक–वेळ निरीक्षण प्रणालीमध्ये टिल्ट मीटर्स आणि क्रॅक प्रोपगेशन गेज स्थापित करणे, तसेच आणीबाणीची परिस्थिती उद्भवल्यास आवश्यक उपकरणे आणि पथके तयार ठेवण्याचे निर्देश विभागीय रेल्वे व्यवस्थापक नागपूर आणि भुसावळ रेल्वे विभागाला देण्यात आले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला रेल्वे रुळाखालील बेलपुराकडे जाणारा समांतर रस्ता वाहतुकीसाठी सुरक्षित असल्याबाबत खातरजमा करावी आणि त्याची तपासणी करून प्रमाणपत्र देणे, नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक सूचना फलक आणि इतर उपाययोजना करावी, तसेच आदेशाचे तात्काळ पालन झाले नसल्यास राष्ट्रीय आपत्कालीन व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत कारवाई करण्यात येणार आहे, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे

# अंबादेवी नवरात्र यात्रेत प्लास्टिक बंदी मोहीम

## प्रतिबंधित प्लास्टिक वापरावर दंडात्मक कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती–**

अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या निर्देशानुसार अंबादेवी नवरात्र यात्रेत प्लास्टिक बंदी मोहीम राबविण्यात आली.सदर मोहीम अंतर्गत विविध स्थळांवर जनजागृती करण्यात आली आणि यात्रेत सहभागी नागरिक व व्यापाऱ्यांना प्रतिबंधित प्लास्टिकच्या वापराबाबत सचेत




केले गेले. एका आस्थापनेस प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर केल्यामुळे रुपये ५०००/– दंड करण्यात आला.मोहीम दरम्यान ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक विजय बुरे, प्लास्टिक बंदी प्रमुख विकी जेधे तसेच झोन क्रमांक २ चे स्वास्थ्य निरीक्षक उपस्थित होते. त्यांनी यात्रेत सहभागी नागरिकांना प्लास्टिकच्या दुष्परिणामाबाबत माहिती देऊन पर्यावरणपूरक पर्याय वापरण्यास प्रोत्साहन दिले.अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी नागरिकांना आवाहन केले की, शहरात स्वच्छता व पर्यावरण संवर्धनासाठी प्लास्टिक बंदीचे नियम काटेकोरपणे पाळावे व यात सहकार्य करावे.–




# बहुजीवनसत्त्वांवर अवलंबून राहताना...

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

आज कोणत्याही फार्मसीमध्ये गेलो की समोर चमचमीत बाटल्यांच्या रांगा लागलेल्या दिसतात. त्यावरच्या जाहिराती मोठमोठ्या आश्वासनांनी भारलेल्या असतात. रोगप्रतिकारक शक्ती अधिक मजबूत होईल, शरीरात ऊर्जा वाढेल, रोज ताजेतवाने वाटेल आणि आयुष्य अधिक निरोगी बनेल. धावपळीच्या जीवनशैलीत, प्रक्रिया केलेल्या अन्नावर वाढत्या अवलंबित्वामुळे आणि जेवणात पोषणतत्त्वांची कमतरता भासल्यामुळे अनेकांना या रंगीत गोळ्या म्हणजे सर्व समस्यांचे उत्तर वाटू लागले आहे. पण, या गोळ्या खरोखर तितक्या परिणामकारक असतात का? तसेच त्या नियमित घ्याव्यात का? याबाबतची संशोधने काय सांगतात?



अमेरिकेतील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटने जवळपास चार लाख प्रौढांवर केलेल्या दीर्घकालीन अभ्यासात असे आढळले आहे की, मल्टिव्हिटॅमिन्स घेतल्याने आयुष्यमानात कोणतीही वाढ होत नाही. उलट, काही निष्कर्ष असे दर्शवतात की नियमित सेवनामुळे मृत्यूदर किंचित वाढलेला दिसतो. ही बाब चिंताजनक आहे. दुसरीकडे जागतिक पातळीवर आजही दोन अब्जांहून अधिक लोकांना सूक्ष्म पोषणतत्त्वांची, विशेषतः लोह, डी जीवनसत्त्व आणि बी १२ जीवनसत्त्व यांची कमतरता जाणवते. असे असले तरी सर्वांसाठी एकसारख्या गोळ्या या गरजा पूर्ण करू शकत नाहीत, हे लक्षात घेतले पाहिजे.खरे म्हणजे, पोषक तत्त्वे नैसर्गिक अन्नामध्ये परस्परांशी सुसंवाद साधून काम करतात. उदाहरणार्थ, लिंबू, संत्रे यांसारख्या फळांतील जीवनसत्त्व सी, डाळींमधील लोह शोषून घेण्यास मदत करते. ही नैसर्गिक प्रक्रिया एका गोळीतून कधीच साध्य होत नाही. म्हणूनच फक्त गोळ्यांवर अवलंबून राहणे योग्य नाही. बहुतेक मल्टिव्हिटॅमिन्स गोळ्या व औषधांमध्ये आवश्यक पोषकतत्वांचे प्रमाण कमी असते. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, त्यामधील जीवनसत्त्वांची जैवउपलब्धता कमी असते. म्हणजेच शरीराला ती योग्य प्रकारे शोषून घेणे अवघड जाते. त्यात बरेचदा संरक्षक द्रव्ये किंवा दर्जाहीन घटक मिसळलेले असू शकतात. सबब आरोग्यपूर्ण जीवनशैली फक्त गोळ्यांवर नाही, तर पचनसंस्थेचे स्वास्थ्य, पुरेशी झोप आणि ताणाचे व्यवस्थापन या सर्व गोष्टींवर अवलंबून असते.

# पिंक ई–रिक्षाने दिले नवे जीवन

## सुषमा गायकवाड यांची संघर्षगाथा

जिल्ह्यातील पिंक ई–रिक्षाच्या प्रथम लाभार्थी सुषमा धीरज गायकवाड यांना पतीच्या निधनानंतर संघर्षाचा सामना करावा लागला. पतीच्या निधनानंतर त्यांची परिस्थिती खूपच कठीण झाली होती. त्यांनी ४ व ६ वर्षे वयाच्या मुलींच्या संगोपनासाठी आणि स्वतः जीवनात पुन्हा उभे राहण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, अमरावती मधून पिंक ई–रिक्षाचा अर्ज भरला. त्या प्रक्रियेतून त्यांना ई–रिक्षा मिळाली. ज्यामुळे त्यांना रोजगार मिळाला. आता त्या दिवसाला साधारणपणे ८०० ते ९०० रुपये कमावतात. त्या दिवसाला सुमारे ७० ते ८० किलोमीटर प्रवास करतात. आज त्या सक्षमपणे आपल्या दोन्ही मुलींना सांभाळीत आहे.

काही वर्षांपूर्वी स्त्रियांना घराबाहेर पडून सुरक्षित प्रवास



करणे मोठे आव्हान होते. अशा वेळी पिंक ई–रिक्षा योजना सुरू झाली. ही ई–रिक्षा फक्त स्त्रियांसाठी असून, त्याचे चालकही महिला आहेत.

या उपक्रमामुळे अनेक महिलांना रोजगार मिळाला आणि त्यांच्या जीवनात नवा आत्मविश्वास जागा झाला. या महिला वाहन चालकांनी गाडी चालविण्यापासून ते लोकांचा प्रवास सुरक्षित करण्यापर्यंत त्या कुणाच्याही मागे नाहीत, हे सिद्ध केले. आज पिंक ई–रिक्षा प्रवासाचे साधन नाही तर महिला सक्षमीकरणाचे प्रतीक बनले आहे.

**संकलन जिल्हा माहिती कार्यालय अमरावती**

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# नवरात्रीत अमरावतीत पहाटेची धार्मिक दौड

## अंबा-एकवीरा देवीच्या मंदिरात आरतीने समारोप

## दसऱ्याच्या महादौडची तयारी अंतिम टप्प्यात

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती –**

नवरात्रोत्सवानिमित्त शहरात यावर्षी दररोज सकाळी दौड (फेरी) काढली जात आहे. शहराच्या विविध भागातील तरुण, महिला आणि मुले पहाटे या शर्यतीत सहभागी होतात. दररोज अंबा देवी आणि एकवीरा देवी मंदिरात आरती करून या शर्यतीचा समारोप होतो. दरम्यान शेवटच्या दिवशी, मुख्य महादौड काढली जाईल, असा संकल्प व्यक्त करण्यात आला असून त्या दौडची जय्यत तयारी जोरात सुरू आहे.



रोजची दौड आणि दसऱ्याच्या दिवशीची महादौड यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे जिल्हा प्रमुख निशादसिंह जोध यांच्या पुढाकारात हा दैनंदिन उपक्रम सुरु आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या दौडचा प्रारंभ दररोज शहरातील एका मुख्य चौकांपासून केला जातो.पहाटे ५ वाजता दौडला सुरुवात होते. तरुण पुरुष आणि महिला भगवे झेंडे घेऊन त्यात धावतात. पारंपरिक पोशाखात महिला असतात आणि मुले आनंदाच्या घोषणा देतात. शर्यतीदरम्यान संपूर्ण माहौल देव-देश धर्माच्या गाण्यांनी भरलेला असतो. जय भवानी-जय शिवराय, भारत माता की जय, जय दुर्गामाता, हिंदू धर्माचा विजय असो अशा घोषणा दिल्या जातात. दौडच्या शेवटी अंबादेवी आणि एकवीरा देवी मंदिरात आरती केली जाते. यावेळी शेकडो लोक उपस्थित राहतात. देवींना सामूहिक प्रार्थना केल्यानंतर समाजातील एकता, युवा शक्ती आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा घेतली जाते.दररोज पहाटे निघणाऱ्या या दौडसाठी समितीचे अध्यक्ष दीपक पटगलवार, इतर पदाधिकारी आकाश खिरटकर, शुभम कामनापुरे, ऋषी आवाडे, प्रज्वल खापरे, विकास मारोडकर, आदित्य धनवटे यांच्यासह इतर पदाधिकारी राबत असून शहरातील विविध महिला गट, स्वयंसेवक आणि महिला संघटनांचे सहकार्य प्राप्त होत आहे. दुर्गा मातेचा धावा करित धावणे हा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नाही. तर तो हिंदुत्वाचा जिवंत संदेश देतो.या धावण्यामुळे तरुणांमध्ये शिस्त, संघटन, कौशल्य आणि देशभक्ती विकसित होते. ही धाव छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्याच्या वारशाची आठवण करून देते, असे आयोजकांचे म्हणणे आहे.

### दसऱ्याला निघणार महादौड

अंबा-एकविरा देवीच्या नावाने सुरु असलेल्या या नवरात्रौत्सवांतर्गत दहाही दिवस दौड काढली जाते. या दौडचा समारोप शेवटच्या दसऱ्याच्या दिवशी (२ ऑक्टोबर) केला जाणार आहे. या दिवशी शहरात महादौड काढली जाईल, असे महादौड आयोजन समितीचे अध्यक्ष करण धोटे यांनी स्पष्ट केले. जितेश किल्लेकर, अंकित यादव आणि रोहन जाधव आदी पदाधिकारी त्यांना सहकार्य करित आहेत.

# कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग असणे गरजेचे'

## जागर महिला आरोग्याचा' मध्ये कायदेतज्ज्ञ डॉ. वर्षा देशमुख व डॉ.अनिरुद्ध पाटील यांचेमार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती, –** अहिल्यादेवी होळकर यांच्या तिनशेव्या जयंतीनिमित्त जिल्हा प्रशानातर्फे विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्रोत्सवात महिलांच्या आरोग्याबाबत मार्गदर्शन आणि तपासणी शिबिर घेण्यात येत आहे. आज या शिबिरामध्ये महिलांना कायदेविषयक बाबींबाबत माहिती देण्यात आली. 'महिला आणि कायदा ' या विषयावर कायदेतज्ज्ञ डॉ. वर्षा देशमुख यांनी तर 'महिला सबलीकरण' या विषयावर डॉ.अनिरुद्ध पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उपजिल्हाधिकारी श्रद्धा उदावंत, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, जिल्हा खणिकर्म अधिकारी प्रणिता चाफले, नायब तहसीलदार स्नेहल देशमुख, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा आदी उपस्थित होते. जिल्हा नियोजन सभागृहात जागर महिला आरोग्याचा उपक्रमामध्ये राबविण्यात येत आहे. यात कायदेविषयक मार्गदर्शन करतांना डॉ . वर्षा देशमुख म्हणाल्या, स्त्रियांचे सक्षमीकरण म्हणजे नुसता हक्क नसून कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत त्यांचा





सहभाग असणे अत्यंत गरजेचे आहे. बरेचदा स्त्रिया स्वतःच्या पायावर उभ्या असून देखील घरातील निर्णय पुरुषप्रधान संस्कृतीमुळे पुरुष घेतात. यामुळे उच्चशिक्षित स्त्री ही सक्षम झाली आहे, असे म्हणता येणार नाही. तिला घरातील महत्त्वपूर्ण बाबींचा निर्णय घेण्याचा हक्क असणे गरजेचे आहे. तेव्हा स्त्री खऱ्या अर्थाने सक्षम होईल. स्त्रियांच्या संरक्षणासाठी शासनाने सर्व आवश्यक कायदे केलेले आहेत. परंतु या कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी स्त्रियांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. प्रत्येक आईने आपल्या मुलाला अन्य मुलीचा आदर करायला शिकवायला हवे. हे बाळकडू मुलांना घरातून मिळायला हवे, तेव्हाच सशक्त समाज तयार होईल.कार्यालयीन कामकाज करताना काही तक्रार असल्यास विशाखा समितीचा वापर करावा. कोणत्याही अन्यायविरुद्ध आवाज उठवण्या साठी कायदे आहे. महिलांनी कायद्याबाबत साक्षरता बाळगावी , असे आवाहन त्यांनी यावेळी केले. डॉ.अनिरुद्ध पाटील म्हणाले, स्त्री पुरुष समानता ही केवळ कागदोपत्री नसावी. आज स्त्री तिच्या कर्तृत्वाने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहे. स्त्रियांना संधी उपलब्ध करून दिल्यास त्या नक्कीच यशस्वी होतात. मुलांप्रमाणे मुलींनाही प्रगतीसाठी वेळ द्यायला हवा आणि त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा. स्त्री हक्क अबाधित राहावा यासाठी शासन विविध उपक्रम राबवित असतात. याबाबत समाजात सातत्याने जागृती निर्माण केल्या जाते. परंतु त्या कायद्याचा गैरवापर होणार नाही यासाठी प्रत्येक व्यक्तीने नैतिकता बाळगावी. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी स्त्रियांनी स्वतः पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे ते यावेळी म्हणाले.कार्यक्रमाचे संचालन चैताली यादव यांनी तर आभार श्रीमती गांवडे यांनी मानले.

# बडनेऱ्यात पेट्रोल पंप संचालकाची हत्या; हल्लेखोर फरार



## अज्ञातांनी पेट्रोल पंप चालकाला भोकसले, जागेवरच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती**

बडनेरा ते अंजनगाव बारी मार्गावरील हॉटेल रानमार जवळ एका पेट्रोल पंप संचालकाची निर्घृण हत्या करण्यात आली. बुधवारी रात्री दहाच्या सुमारास ही धक्कादायक घटना उघड झाली आहे. मिलिंद मुरलीधर लाड (४६, राहणार जुनी वस्ती बडनेरा ) असे मृताचे नाव आहे. त्यांच्या सर्वांगावर धारदार शास्त्राची घाव असून त्यांना रस्त्यात अडवून अज्ञातांनी त्यांना भोसकले. बडनेरा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मिलिंद लाड यांचे बडनेरा अंजनगाव मार्गावर पेट्रोल पंप आहे. रात्री साडेनऊ ते दहा च्या सुमारास ते पेट्रोल पंपाऊंड परत येत असताना अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्यावर हल्ला चढवला. प्रथमदर्शनी लुटीतून ही हत्या घडली असावी अशी शक्यता बडनेरा पोलिसांनी वर्तवली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त अरविंद चावरीया पोलीस उपायुक्त शाम घुगे व गणेश शिंदे, गुन्हे शाखेचे निरीक्षक संदीप चव्हाण, बडनेराचे ठाणेदार सुनील चव्हाण यांच्यासह पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. या घटनेने नवरात्र उत्सव दरम्यान मोठी खळबळ उडाली आहे.

# अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात हजारो भक्तांना दररोज महाप्रसाद

## नवरात्रोत्सवातच दुपारी १२ ते ३ या वेळेत होते महाप्रसादाचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** शारदीय नवरात्रोत्सवाच्या काळात अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात दररोज दु. १२ ते ३ या वेळेत किमान ३ हजार भाविकांना नि:शुल्क महाप्रसाद वितरित केला जातो. या कालावधीत जेवढे भाविक महाप्रसाद घेण्यास येतील त्या सर्वांना तो प्रदान केला जातो. कोणालाही उपाशी पाठवले जात नाही, अशी माहिती मंदिर संस्थानद्वारे देण्यात आली.



भाजी, पोळी, वरण, भात, चटणी, एक गोड पदार्थ, कढी असे या महाप्रसादाचे स्वरूप असते. अगदी घरीच जेवत आहोत, असे येथे जेवणाऱ्याला वाटते. जेवणात सात्त्विकता ठेवली जाते. तसेच कांदा व लेसणाचाही वापर टाळला जातो. त्यामुळे भाविकांना रुचकर व आरोग्यदायी महाप्रसाद अगदी सहज उपलब्ध होतो. यासाठी भाविकांची दु. १२ वाजतापासून लांबलचक रांग असते. स्वयंसेवकांद्वारे भाविकांना महाप्रसाद वाढला जातो. तसेच पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था आहे. या ठिकाणी बाहेरगावाहून येणारे भाविकच नव्हे तर शहरातील भाविकही प्रसाद घेतात.

महाप्रसाद तयार करण्यासाठी सकाळपासूनच आचारी, महिला आचारी कामाला लागतात. सुरुवातीला किमान एक हजार भाविकांसाठी महाप्रसाद तयार होतो. त्यानंतर गर्दी बघून लगेच महाप्रसाद तयार करणे सुरू होते. तसेच पोळ्या सातत्याने तयार होत असतात. त्यामुळे भाविकांना गरम पोळ्या मिळतात. नवरात्रोत्सवातील ९ ही दिवस ही सोय भाविकांसाठी असते. तसे तर वर्षभर भाविकांसाठी महाप्रसाद तयार केला जातो. परंतु, शारदीय व चैत्र नवरात्रोत्सवाचे ९ दिवस वगळता, इतर वेळी भाविकांकडून अल्प दर आकारला जातो. भाविकांकडून मंदिरात दान केले जाणारे धान्य, तेल तसेच दानदात्यांकडून मिळणाऱ्या दानातून हा महाप्रसादाचा खर्च केला जातो. शहरात अनेक दानदाते हे धान्य, तेल, मसाले, भाजीपाला यांचे दान करत असतात. तसेच जे पदार्थ कमी पडतात त्याची खरेदी मंदिर संस्थानाद्वारे केली जाते.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी

# मतदार यादीचा कार्यक्रम जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती,**




आगामी अमरावती जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याचा सविस्तर कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केला आहे. भारत निवडणूक आयोगाने १ जुलै २०२५ रोजी जाहीर केलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे ही कार्यवाही करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ५९ निवडणूक विभाग आणि ११८ निर्वाचक गणांसाठी मतदार यादीचे विभाजन करून पुढीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात येईल.निवडणूक विभागनिहाय आणि निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदार यादी दि. ८ ऑक्टोबर २०२५ प्रसिद्ध केली जाईल. मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी दि. ८ ऑक्टोबर २०२५ पासून सुरू होणार असून दि. १४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत राहणार आहे. सर्व हरकती व सूचनांचा विचार करून, दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम व अधिप्रमाणित मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. मतदान केंद्रांची आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी दि. २७ ऑक्टोबर २०२५ रोजी प्रसिद्ध केली जाईल.या कार्यक्रमानुसार, सर्व प्रशासकीय यंत्रणांनी वेळेत कार्यवाही पूर्ण करावी, अशा सूचना राज्य निवडणूक आयोगामार्फत देण्यात आल्या आहेत.

## सततच्या पावसामुळे ओला दुष्काळ जाहीर करण्याच्या मागणीला

# प्रहारचा तहसील कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अचलपूर**अचलपूर तहसील कार्यालयावर सततच्या पावसामुळे ओला दुष्काळ जाहिर करण्याच्या मागणीला घेऊन मोर्चा काढण्यात आला होता , सोयाबीन, कपाशी , केळी , संत्रे मुंग , उडीद सारख्या पिकांना अति पावसामुळे फटका बसला आहे , सतत होत असलेल्या पावसामुळे राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे शासनाने त्वरित खरीप हंगामातील



पिकांना हेक्टरी ५० हजार रुपये तर फळ पिकांना एक लाख रुपये त्वरित अनुदान द्यावे , राज्यातील शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी , नुकसानग्रस्त पिकांचे त्वरित पंचनामे करून सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा या मागणी करिता प्रहार पक्षाचे पद अधिकारी कार्यकर्ते यांनी अचलपूरचे तहसीलदारांना निवेदन देऊन मागणी केली यावेळी प्रहार चे तालुकाध्यक्ष निलेश जाधव , दीपक भोरे , नितीन आगे , संजय तट्टे , अनिल पिंपळे , सहित प्रहार चे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# चिखलदरा येथे राष्ट्रीय पोषण अभियान उत्साहात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती –**

चिखलदरा येथे आठवा राष्ट्रीय पोषण अभियान कार्यक्रम उत्साहात पार पडला. यानिमित्ताने पोषणदिंडी उत्स्फूर्तपणे काढण्यात आली. महिला व बाल विकास विभाग, चिखलदरा तसेच आरोग्य विभाग व पंचायत समितीच्या वतीने पोषण माहच्या अनुषंगाने विविध कार्यक्रम घेण्यात आले. यात प्रामुख्याने किशोरी मुलींना संतुलित आहार व आरोग्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पोषण अभियान अंतर्गत किशोरी मुलींची आरोग्य तपासणी आणि १००




किशोरी मुलींना सॅनिटरी पॅडचे मोफत वितरण करण्यात आले. बालविवाह निर्मूलनाबाबत व्याख्यान आणि जनजागृतीपर पोषण दिंडी काढण्यात आली. पोषण माहमध्ये 'बेटी बचाव, बेटी पढाव'च्या अनुषंगाने स्वाक्षरी मोहीम घेण्यात आली. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी बालविवाहाच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. कमी वयात केलेल विवाहामुळे सामाजिक समस्येसोबतच महिलांमध्ये आरोग्याचे प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगितले. महिलांनी पोषण आहारावर लक्ष केंद्रीत केल्यास कुटुंबातील वातावरणही चांगले राहण्यास मदत होणार असल्याचे सांगितले. मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी महिलांच्या पोषण आहाराबाबत माहिती दिली. महिलेचे चांगले पोषण झाल्यास चांगली पिढी घडू शकते. तसेच कमी वयातील विवाह टाळण्यासाठी समाजाने जागरूक राहून कार्य करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रकल्प अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सिध्दार्थ शुक्ला, सहायक जिल्हा अधिकारी कौशल्या एम. महिला व बाल विकास विभागाचे उपमुख्य कार्यकारी विलास मरसाळे, तहसिलदार जीवन मोरानकर, गटविकास अधिकारी विनोद खेडकर, बाल विकास प्रकल्प अधिकारी जगन्नाथ गारुळे, पर्यवेक्षका व अंगणवाडी सेविका, एकात्मिक बाल विकास योजनाचे कर्मचारी उपस्थित होते.

# पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, येथे फार्माकोविजिलन्स विषयावर व्याख्यान

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२५अमरावती**

पी. आर. पोटे कॉलेज ऑफ फार्मसी, अमरावती येथे फार्मसी विद्यार्थ्यांसाठी फार्माकोविजिलन्स या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. बन्सोड सर MBBS.MD. Pharmacology विभाग प्रमुख, डॉ.पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती यांनी उपस्थित राहून मार्गदर्शन केले.


आपल्या व्याख्यानात डॉ. बन्सोड यांनी औषधांच्या वापरानंतर उद्भवणाऱ्या दुष्परिणामांचे निरीक्षण, योग्य नोंदणी व विश्लेषण यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांना औषध सुरक्षिततेसंदर्भातील सखोल माहिती मिळाली तसेच प्रत्यक्ष उदाहरणांच्या आधारे शंका निरसनही करण्यात आले.हा कार्यक्रम कॉलेजच्या प्राचार्यां डॉ. दीप्ती बी. रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. रुपाली गावंडे, प्रा. आज्ञा बुरंगे व प्रा. भक्ती नागरे यांनी विशेष परिश्रम घेतले.या प्रसंगी कॉलेजचे उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या व्याख्यानाचा मोठा लाभ घेतला व अशा शैक्षणिक उपक्रमांचे सातत्याने आयोजन व्हावे, अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली.-

# मंगरूळ ची मंगलामाता: माहूरचे उपशक्तिपीठ...

## द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजीं व सर संघचालक मोहन भागवत यांनी घेतले दर्शन

**.विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धा.रेल्वे**

अमरावती जिल्ह्यातील धामणगाव तहसिल मध्ये मंगरूळ दत्त हे बारा मुंडाचे गाव असुन या गावात सुंदर व भव्य अनेक मंदिरे आहे. संत महात्म्यांच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या या गावाच्या पश्चिमेकडे एक कि.मी. अंतरावर पूर्वाभिमुख भगवती मंगलामातेचे प्राचिन व जागृत स्थान आहे. इसवी सन २००० मध्ये या मंदिराच्या बांधकामाचे जुने झाले असता कौंडण्यपूर येथील शंकराचार्य भागवत महाराज यांनी उद्बोधन करताना बाळ,परत ये,मी वाट पाहते असे उच्चारले आणि हेच ब्रिदवाक्य पुढे प्रचलित आणि प्रख्यात झाले राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवळकर गुरुजी या ठिकाणी १९४२ आले होते त्यांना भगवतीचा साक्षात्कार झाला गुरूजींनी हे स्थान जागृत असल्याचे सांगितले होते गोळवळकर गुरुजी यांच्या मंदिरातील साक्षात्कार ८१ वर्षाचा वर्षपूर्ती निमित्त याच वर्षी २४ फेब्रुवारी २०२४ ला वर्तमान सरसंघचालक डॉक्टर मोहनजी भागवत यांनी सुद्धा मंदिरात येऊन आई मंगला मातेचे दर्शन घेतले.या गावाला संतांची भुमी आणि मंदीरांचे गाव असेही म्हणतात. संत लहानुजी महाराज व संत गणपती महाराज यांचा जन्म येथेच झाला होता.श्री. मंगला मातेच्या येथील वास्तव्याबद्दल असे सांगतात की साधारण २०० वर्षापुर्वी येथील कोणी भक्त नवरात्रात माहूर ला रेणुका मातेच्या दर्शनास जात होता. पुढे तो वृध्दावस्थे मुळे माहूर ला जाऊ शकत नसल्यामुळे तो फार दु:खी झाला. रेणुका माता



म्हणाली तू चिंता करु नकोस मीच तुझ्या गावाला येते. पुढे कोणी सदपुरुष या मार्गे जात असता त्याच्या नित्य पूजेतील श्री रेणुकाई चा तांदळा येथे मंगलधाम परिसरात राहिला. पुढच्या मुक्कामी तांदळा (मुखवटा) नसल्याचे लक्षात आल्यावर तो परत मंगलधाम परिसरात आला असता रेणुकाई ने मी आता येथेच राहणार असे सांगितले. तो प्रगट दिन चैत्र शु. चतुर्दशीचा होता, तेव्हापासुन आजही चैत्र शु. १४ ला येथे दरवर्षी कुळाचाराचा उत्सव होतो. या मंगलामातेला भवानी माता सुद्धा म्हणतात. हे स्थान माहूर क्षेत्राचे 'उपशक्तीपीठ' असल्यामुळे माहूरच्या रेणुकाई ला केलेला नवस येथे सुद्धा फेडतात. ही मंगला माता अनेक घराण्यांची कुलदेवता आहे. मध्यंतरी काही काळ हे स्थान दुर्लक्षित होते.प.पू. स्वामी शिलानंद सरस्वती हे संन्यास घेतल्यानंतर साधना करण्याकरिता माहूर वरून स्थान शोधत मंगरूळ ला आले.देवी भागवतातील नवम स्कंधात 'मंगलचंडी' नावाने श्री मंगलामातेचा उल्लेख आहे. भक्तांचे मंगल करण्याकरिता जी तत्पर आहे ती 'मंगलचंडी' फार पूर्वी मंगल नावाच्या राजाने प्रकृती अंश सावित्रीदेवीची उपासना केली.राजाच्या विनंतीने देवी सावित्रीच त्याचे घरी कन्या रूपाने प्रकट झाली म्हणुन तिचे नाव मंगलादेवी असे ठेवले. 'मंगलांधयति इति मंगला' जन्म मृत्यरुप दुःखातून जी भक्तांना तारते ती मंगला. ही मंगला देवी मंगळ ग्रहाची अधिष्ठात्री आहे. हिच्या उपासनेने मंगळ ग्रहाचे दोष नाहीसे होतात. मंगला देवीच्या उपासनेने विवाह आदी कार्ये लवकर होत असल्याचा अनेक भक्तांचा अनुभव आहे. मंगळागौरी चे व्रत हिच्याच नावाने करतात. मंगलादेवी चे स्थान भारतात दोनच ठिकाणी आहे. एक काशी क्षेत्री मंगलागौरी व दुसरे मंगरूळ दत्त ला.मंगरूळच्या मंगला माता देवस्थानचे व्यवस्थापन व सेवा अध्यक्ष प्रभाकर खानजोडे,उपाध्यक्ष दिवाकर देशपांडे,सचिव रवींद्र देशपांडे, सह सचिव प्रशांत शेटे कोषाध्यक्ष राजेश सोनी,विश्वस्त जुगलकिशोर मुंदडा, प्रदीप फडणवीस,शरदचंद्र देशपांडे सह मुख्य पुजारी मोहन देव,व्यवस्थापक विवेक देव, भूषण पिंपळे, सुदाम जांभुरे व देवीचे परमभक्त वैभव पोतदार मंदिराचे प्रसिद्धी प्रमुख हे प्रचार व प्रसाराचे चे कार्य प्रामुख्याने पाहतात.

# शिवधाम मंदिर परिसरातील समस्यांवर तोडगा निघावा अन्यथा उपोषण - नागरिकांचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५वरुड-** शिवधाम मंदिरासमोरील वस्तीत अनेक वर्षांपूर्वी लेआऊट पडून नागरिकांनी प्लॉट घेऊन घरे बांधली. मात्र आजही या वस्तीत मूलभूत सोयींच्या समस्या तशाच प्रलंबित आहेत. रस्ते, नाल्या, लाईट व्यवस्था यांचा अभाव असल्याने नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.मंदिरासमोरील मुख्य रोड व काही नाल्या झाले असले तरी वस्तीतल्या दोन लहान रस्त्यांकडे (१८ ते २० मीटर) अजूनही दुर्लक्षच झाले आहे. येथील नाल्यांचे पाणी दुसऱ्या नाल्यात सोडण्याची व्यवस्था केली नसल्याने परिसरात अस्वच्छता वाढली आहे. वस्तीमध्ये नाल्या नाहीत, लाईटचीही सुविधा उपलब्ध नाही. विशेष म्हणजे, जेथे लोकवस्तीच नाही तेथे उत्तम रस्ते करून सिमेंट रस्ता टाकण्यात आला; मात्र ज्या वस्तीमध्ये लोक वास्तव्यास आहेत, तेथील नागरिकांकडेच प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, अशी तीव्र नाराजी रहिवाशांत आहे.या समस्यांबाबत वस्तीतील सर्व नागरिकांनी आमदार चंदू यावलकर यांच्याकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सामूहिक निवेदन देऊन चर्चा केली. मात्र अनेक वर्षांपासून निवेदने देऊनही कार्यवाही झालेली



नाही.घाणीचे साम्राज्य, पावसाळ्यातील चिखल व असुविधेमुळे नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. यापुढील १५ दिवसांत काही ठोस उपाययोजना न झाल्यास वस्तीतले नागरिक आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना शिवधाम मंदिर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजकमल चौकवर फ्लॅश मोबद्वारे स्वच्छतेसाठी जनजागृती

## नागरिकांनी घेतली स्वच्छतेची शपथ




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

शहरातील स्वच्छतेबाबत जागरूकता वाढविण्यासाठी अमरावती महानगरपालिका आणि यंग मार्वल सर्विसेस एलएलपी यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी राजकमल चौक येथे एक प्रभावी फ्लॅश मोब आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश शहरातील नागरिकांमध्ये स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे व स्वच्छता अभियानाला अधिकाधिक जनसहभाग मिळविणे हा होता. कार्यक्रमामध्ये तरुण स्वयंसेवक व कर्मचारी यांनी कचरा वर्गीकरण, स्वच्छतेची सवय, तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचे महत्त्व प्रभावी पद्धतीने सादर केले.या कार्यक्रमास अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक उपस्थित होत्या. तसेच महानगरपालिकेचे इतर अधिकारी व कर्मचारीही या कार्यक्रमात सहभागी झाले होते. उपस्थित नागरिकांनी तरुण स्वयंसेवकांच्या प्रेरक सादरीकरणाचा उत्साहाने पाठिंबा घेतला.कार्यक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता आणि उत्सुकता निर्माण झाली. अनेक नागरिकांनी स्वच्छतेची शपथ घेतली व महानगरपालिकेसह सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.अमरावती महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, असे फ्लॅश मोब कार्यक्रम शहरातील स्वच्छतेसाठी जनजागृती निर्माण करण्यास खूप प्रभावी ठरतात.राजकमल चौक येथे आयोजित हा फ्लॅश मोब नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जबाबदारीची भावना जागृत करणारा आणि सार्वजनिक सहभाग वाढवणारा उपक्रम ठरला.अमरावती महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी नागरिकांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्वच्छता ही फक्त प्रशासनाची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. त्यांनी पुढील मुद्द्यांवर भर दिला की, कचरा वर्गीकरण तसेच घरात आणि सार्वजनिक ठिकाणी कचरा योग्य प्रकारे वेगळा करणे आवश्यक आहे. स्वच्छतेची सवय तसेच रोजच्या जीवनात स्वच्छता ही सवय बनवणे महत्त्वाचे आहे. सार्वजनिक जागा स्वच्छ ठेवणे. सार्वजनिक स्थळे, रस्ते, उद्याने स्वच्छ ठेवणे हा नागरिकांचा कर्तव्य आहे. जनजागृतीत सहभाग: प्रत्येक नागरिकाने स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग घेतला पाहिजे आणि इतरांना देखील प्रेरित करावे.महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक यांनी आवाहन केले की, अमरावतीकरांनो, आपल्या शहराची स्वच्छता ही आपली सर्वांची जबाबदारी आहे. आजच्या फ्लॅश मोबद्वारे आपण सर्वांनी स्वच्छतेबाबत जनजागृती केली, परंतु हा प्रयत्न सतत सुरू ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मला आशा आहे की प्रत्येक नागरिक आपल्या घरात आणि सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखेल, कचरा वर्गीकरणाची सवय अंगीकारेल, आणि आपल्या शहराला निरोगी व स्वच्छ ठेवण्यासाठी योगदान देईल. एकत्र येऊन आपल्या शहराला स्वच्छ, निरोगी आणि सुंदर बनविण्यासाठी नियमित प्रयत्न करावे.-

# नागरिकांच्या तक्रारीची दखल...

## मनपा आयुक्तांची वारकरी नगर, ज्योती कॉलनी, कुंभारवाडा व स्वागतम कॉलनी परिसरात स्वच्छता, कच्चा रस्ता व नाल्यांची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

नागरिकांच्या तक्रारीला तत्परतेने प्रतिसाद देत अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी वारकरी नगर, ज्योती कॉलनी, कुंभारवाडा व स्वागतम कॉलनी परिसराची पाहणी केली.या पाहणीदरम्यान आयुक्तांनी परिसरातील साफसफाईची स्थिती, कच्चे रस्ते, नाल्यांची स्वच्छता व वाहतुकीची अडचण याबाबत थेट निरीक्षण केले. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. नागरिकांनी सांडपाणी व्यवस्थापन, नाल्यांची नियमित सफाई, कच्च्या रस्त्यावरील खड्डे आणि कचरा व्यवस्थापनाबाबत समस्या मांडल्या. महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देत, संबंधित विभागांनी जबाबदारीने कार्यवाही करावी असे स्पष्ट आदेश दिले. विशेषतः स्वच्छता विभाग, बांधकाम विभाग, प्रकाश विभाग व उद्यान विभागाला नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याचे सांगण्यात आले.नागरिकांशी थेट संवाद साधत आयुक्तांनी आश्वासन दिले की, महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्व तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यात येईल. नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे.या पाहणीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाची भावना



निर्माण झाली असून, महानगरपालिकेकडून तात्काळ कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी निर्देश दिले की, परिसरातील कच्च्या रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरावेत. नाल्यांची नियमित स्वच्छता व देखभाल करण्यात यावी. परिसरातील कचरा व्यवस्थापना बाबत त्वरित उपाययोजना करावी. नागरिकांच्या तक्रारींवर त्वरित प्रतिसाद देऊन निराकरण करावे. संबंधित विभागांनी जबाबदारीने व समन्वयाने कार्यवाही करावी. महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आवाहन केले की, नागरिकांनी परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी महानगरपालिकेला सहकार्य करावे. कचरा वेळेत व ठरलेल्या ठिकाणीच टाकावा, रस्ते व नाल्यात टाकू नये. स्वच्छता राखणे ही फक्त महानगरपालिकेची नव्हे तर सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. समस्या आढळल्यास नागरिकांनी महानगर पालिकेच्या हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी. शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा.या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, माजी नगरसेविका सुमती ढोके, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त धनंजय शिंदे, सहाय्यक आयुक्त तथा जनसंपर्क अधिकारी भुषण पुसतकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक शारदा गुल्हाणे, स्वास्थ निरीक्षक वैभव खरड, श्री. सावरकर, सागर राजुरकर, कंत्राटदार प्रतिनिधी, मनपा कर्मचारी, परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# आदिवासी मजूर महिलेची जंगलातच प्रसूती !आई व बाळ सुखरूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५तिवसा -** तिवसा शेतात काम करणाऱ्या आदिवासी मजूर महिलेची शेतातच प्रसूती झाल्याची घटना रात्रीच्या सुमारास घडली. प्रसूतीनंतर आई व बाळ दोघेही सुखरूप आहेत. ही घटना तिव्रसा तालुक्यातील राळेगाव ठाकूर येथे घडली. प्रसूतीनंतर महिलेला पुढील उपचारासाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.रेश्मा देवा कासटेकर (२६) रा वालखेडा ता. आठणेर जि. बैतुल ही महिला तळेगाव ठाकूर येथील एका शेतात परिवारासह मजुरीचे काम करीत होती. अशातच मंगळवार २३ सप्टेंबर रोजी रात्री ७.३० वाजताच्या सुमारास तिची शेतातव प्रसूती झाली, तळेगाव ठाकूर येथील गावापासून ७ ते ८ किलोमीटर लांब अंतरावर असलेल्या शेतात महिलेलाप्रसूती कळा आल्या, तर रात्रीची वेळ व अंधाराचे साम्राज्य असलेल्या यावेळी त्यांचा कुटुंबाचा जीव



कासावीस झाला होता. मात्र डिलेव्हरी सुखरूप होऊन बाळाला जन्म दिला. पण महिलेला मोठ्याप्रमाणात वेदना व त्रास सोसवा लागले, ही वार्ता तळेगाव ठाकूर येथील काही गावकरी याना कळताच त्यांनी तातडीने धाव घेतली व तळेगाव ठाकूर येथील शासकीय रुग्णालय केंद्रातील रुग्णवाहिका सांगत शासकीय रुग्णालयातील डॉक्टर व आशावर्कर यांनी तातडीने धाव घेतली. अमरावती जिल्हा शासकीय रुग्णालयात आई व बाळाला दाखल करण्यात आलेयावेळी गावातील नागरिक नितीन थोरात, मुकेश कांबळे, दशरथ धोरात,विद्रुकूल थोरात, अमन तायडे, अक्षय थोरात, धीरज थोरात, समीर पठाण, आशा वर्कर सौ. कामिनी मुकेश कांबळे यांनी तातडीने धाव घेतली, प्राथनिक आरोग्य केंद्र तळेगाव ठाकूर येथील वैद्यकीय अधिकारी डॉ सुनील राठोड, वाहन चालक समीर पठाण अनिकेत बादशे आदींनी मदतीसाठी सहकार्य केले.

# नियमबाह्य ढाब्यावर धाड - इंग्लिश दारूचा साठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५पथ्रोट** मागील सात महिन्यांपासून नियमबाह्य पद्धतीने सुरू असलेल्या ढाब्यावर पोलिसांच्या झाडाझडतीत २४ सप्टेंबरच्या दुपारी तीन वाजताच्या दरम्यान पुन्हा एकदा इंग्लिश दारू आढळून आली.

परवानाधारक बार मालकाने तक्रार करून शोधकार्यात पुढाकार घेतल्याने दारूच्या अवैध विक्रीबाबत ढाबा मालकावर कारवाईकडे का बरं दुर्लक्ष केल्या जाते, याबाबत अनेक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

गावाच्या मध्यभागी असलेल्या एका रहिवाशी ले आउटच्या अम्युनिटी सेंटरवर ग्रामपंचायतने एनओसी नाकारल्यानंतरही नियमबाह्य पद्धतीने अंजनगाव येथील एका व्यक्तीने ढाबा व्यवसाय सुरू केला आहे.



त्या ठिकाणावरून दारूविक्रीचा व्यवसाय सुरू झाल्यावर परिसरातील रहिवाशांनी त्याची पोलिस ठाणे व ग्रामपंचायतमध्ये तक्रार नोंदवून कारवाईची मागणी केली होती; परंतु मागील सात महिन्यात ग्रामपंचायतकडून तीन नोटीस देण्यापलीकडे काहीही झाले नाही, तर पोलिस ठाणेकडून एकदा कारवाई झाल्यानंतर त्या ठिकाणी दारू विकणार नाही, असे हमीपत्र ढाबामालकाने लिहून दिले होते तरीसुद्धा त्याने नियमितपणे त्या ठिकाणी दारू विकण्याचे आपले कार्य सुरूच ठेवले आहे. याबाबत व्हिडिओ शूटिंगसारखे पुरावे दिल्यानंतरसुद्धा त्याच्याविरुद्ध कुठलीच कायदेशीर कारवाई करण्यात आली नाही, हे विशेषअशातच बाजूलाच असलेल्या परवानाधारक बारवर ढाब्यावरील दारू विक्रीच्या व्यवसायाचा प्रभाव पडला. अशावेळी शासनाला नियमित कर भरून परवानाच्या माध्यमातून नियमानुसार मद्यविक्रीचा व्यवसाय करतेवेळी आवश्यक विक्री होत नसून लगतच्या नियमबाह्य ढाब्यावर मात्र चढ्या भावाने दारूची विक्री सुरू आहे, मग आम्हाला परवाना काढण्याचा काय फायदा झाला. असा प्रश्न उपस्थित करून यावर बारमालकाने संबंधित विभागावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# महिला महाविद्यालयात ओझोन दिवस साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती-**

स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय जोग चौक, अमरावती येथे विज्ञान विभागातर्फे जागतिक ओझोन दिनानिमित्त पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे विषय ओझोन थराचे संरक्षण, पृथ्वी वाचवा निसर्ग वाचवा, प्लास्टिक प्रदूषण, ग्लोबल वॉर्मिंग हे होते. या स्पर्धेकरिता कनिष्ठ विभागातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी उत्कृष्ट पोस्टर तयार केले व स्पर्धेत सहभागी झाल्या. या स्पर्धेत प्रथम



क्रमांक आर्या धोपाडे हिने पटकाविला. द्वितीय क्रमांक समीक्षा कांबळे व तृतीय क्रमांक दृष्टी जाधव यांनी पटकाविला. तसेच उत्तेजनार्थ बक्षीस सलोनी पटेल व हर्षिता येवले या विद्यार्थिनींनी पटकाविले. स्पर्धेचे परीक्षक प्रा. नितीन कोळेश्वर व महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी सोनपरोते यांनी स्पर्धेचे परीक्षण केले.याप्रसंगी नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे सचिव मा. प्रा.हितेश व्यास आणि महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ.अरुणा वाडेकर यांनी विद्यार्थिनींचे कौतुक केले. या स्पर्धेकरिता विज्ञान विभागातील प्रा. पोकळे प्रा. धर्माधिकारी प्रा. साबळे व प्रा. घुगे यांनी विशेष प्रयत्न केले. या स्पर्धेला कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवृंद व विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# अमरावती महापालिकेतर्फे भव्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न, मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांचा सहभाग

## महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक व तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून विद्यार्थ्यांना परीक्षा तयारीचे दिशादर्शन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य दिशादर्शन मिळावे, त्यांच्या मनातील संभ्रम दूर व्हावा, आत्मविश्वास वाढावा तसेच करिअरमध्ये यश संपादन करण्यासाठी योग्य मार्ग आखता यावा या हेतूने अमरावती महानगरपालिकेतर्फे आज दिनांक २४ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावती येथे दुपारी १२ ते ४ वाजेपर्यंत ही कार्यशाळा पार पडली.कार्यशाळेचे उद्घाटन सौम्या शर्मा (चांडक), आयुक्त तथा प्रशासक, अमरावती महानगरपालिका (2018 UPSC AIR 9) यांच्या शुभहस्ते झाले.या कार्यशाळेत UPSC, MPSC, राज्यसेवा, STI, PSI तसेच Banking व SSC यांसारख्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना तज्ज्ञांकडून थेट मार्गदर्शन करण्यात आले.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून सौम्या शर्मा (चांडक), आयुक्त तथा प्रशासक, अमरावती महानगरपालिका (2018 UPSC AIR 9) यांनी विद्यार्थ्यांना णझडउ परीक्षेच्या संपूर्ण तयारीबाबत मार्गदर्शन केले. परीक्षेच्या वेळापत्रकापासून ते अभ्यास पद्धती, शिस्त, मानसिक तयारी व यशासाठी लागणाऱ्या गुणवैशिष्ट्यांवर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक सौम्या शर्मा (चांडक) यांनी कार्यशाळेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की स्पर्धा परीक्षा ही फक्त ज्ञानाची कसोटी नसून शिस्त, संयम, सातत्य व आत्मविश्वासाची देखील परीक्षा आहे. परीक्षेची तयारी करताना नियोजनबद्ध अभ्यास, वेळेचे योग्य व्यवस्थापन, विषयांचे सखोल आकलन आणि नियमित पुनरावलोकन हे घटक अत्यंत महत्त्वाचे आहेत. यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण परिश्रम हीच गुरुकिल्ली आहे. UPSC, MPSC सारख्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय परीक्षांमध्ये केवळ अभ्यास पुरेसा नसतो, तर त्यासोबतच मानसिक तयारी, संवादकौशल्य आणि समस्येचे निराकरण करण्याची क्षमता विकसित करणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय स्पष्ट ठेवून अभ्यासात एकाग्रता ठेवावी. अपयश आल्यास खचून न जाता त्यातून शिकण्याची संधी घ्यावी. प्रत्येक परीक्षेतून अनुभव मिळतो आणि तो अनुभवच पुढील यशाची पायरी ठरतो. स्पर्धा परीक्षांचा प्रवास आव्हानात्मक असला तरी योग्य दिशा, दृढनिश्चय आणि सातत्यपूर्ण प्रयत्न यांच्या बळावर कोणतेही लक्ष्य गाठणे शक्य आहे. समाज आणि राष्ट्रासाठी योगदान देण्याची संधी या परीक्षांमधून मिळते, त्यामुळे या संधीचे सोनं करावं.महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आवाहन केले की, सर्व विद्यार्थ्यांनो, स्पर्धा परीक्षा ही तुमच्या भविष्याचा पाया आहे. अभ्यासात सातत्य ठेवा, आत्मविश्वास वाढवा आणि वेळेचे नियोजन नीट करा. अपयश येण्याची भीती बाळगू नका, प्रत्येक चुकून शिकण्याची संधी समजा. या कार्यशाळेत मिळालेल्या मार्गदर्शनाचा अधिकाधिक लाभ घ्यावा. योग्य दिशा, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि धैर्य यांच्या बळावर तुम्ही निश्चितच आपल्या उद्दिष्टांना गाठू शकता. तुमच्या यशासाठी शुभेच्छा!श्री. महेश सुभाष पाटील, शाश्वत अकॅडमी, पुणे यांनी इंग्रजी विषयाचे महत्त्व विशद करताना त्यावरील सविस्तर मार्गदर्शन दिले. स्पर्धा परीक्षा तयारीत इंग्रजी भाषेचे स्थान किती महत्त्वाचे आहे व त्याची अभ्यासाची योग्य दिशा कशी असावी हे त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिले.श्री. महेश सुभाष पाटील, शाश्वत अकॅडमी, पुणे यांनी स्पर्धा परीक्षांसाठी इंग्रजी विषयाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले UPSC, MPSC तसेच Banking, SSC व इतर स्पर्धा परीक्षांमध्ये इंग्रजी विषय हा विद्यार्थ्यांसाठी आव्हानात्मक ठरतो. इंग्रजीचा अभ्यास केवळ विषयापुरता मर्यादित ठेवू नये, तर तो दैनंदिन वाचन, लेखन आणि संभाषणातून विकसित करणे गरजेचे आहे. शब्दसंपदा वाढविणे, व्याकरणाची शिस्त, वाचन समज (Reading Comprehension) आणि लेखन कौशल्य (Essay, Precis Writing) या घटकांवर सातत्याने काम केल्यास इंग्रजी विषयावर प्रभुत्व मिळवता येते. तयारी करताना नियमित इंग्रजी वर्तमानपत्र वाचणे, छोट्या टिपा बनविणे, शब्दकोशाचा वापर करणे आणि सराव प्रश्न सोडविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुलाखतीसाठी संवादकौशल्य विकसित करणे हेसुद्धा तितकेच गरजेचे आहे. स्पर्धा परीक्षेत इंग्रजी हा केवळ एक विषय नसून, ती आत्मविश्वास वाढविणारी भाषा आहे. विद्यार्थ्यांनी त्याकडे अडथळा म्हणून न पाहता, स्वतःच्या यशाचा साथीदार म्हणून पाहावे.उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी कार्यशाळेच्या प्रारंभी प्रास्ताविक करत विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवत मार्गदर्शन केले. या भव्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी उपस्थित विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक स्वागत करण्यात आले. स्पर्धा परीक्षा हा केवळ ज्ञानाची कसोटी नाही, तर संयम, शिस्त, सातत्य व आत्मविश्वास यांचीही परीक्षा आहे. विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित ठेवावे, वेळेचे योग्य व्यवस्थापन करावे आणि अभ्यासाच्या प्रत्येक टप्प्यावर सातत्यपूर्ण प्रयत्न करणे आवश्यक आहे. आजच्या कार्यशाळेत आपल्याला प्रख्यात मार्गदर्शकांकडून थेट मार्गदर्शन मिळणार आहे, ज्यामुळे आपल्या तयारीला दिशा मिळेल आणि तुम्ही आपल्या उद्दिष्टांकडे आत्मविश्वासाने वाटचाल करू शकता. या कार्यशाळेत आपण केवळ परीक्षेच्या तयारीसाठी नव्हे तर जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये, संभाषणतंत्र, करिअरच्या सोपान आणि मानसिक तयारी याबाबत सखोल मार्गदर्शन मिळवणार आहोत. तुमच्या सहभागामुळे आजचा दिवस अधिक अर्थपूर्ण ठरेल, आणि आपण या संधीचा अधिकाधिक लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी केले आहे.या कार्यशाळेत सामान्य अध्ययन, संभाषण कौशल्य, मुलाखत तंत्र व करिअर सोपान या महत्त्वाच्या विषयांवर विशेष भर देण्यात आला. यामुळे स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जीवनातील आवश्यक कौशल्यांचा विकास करण्याचेही दिशादर्शन मिळाले.यावेळी श्री. सुभाष पवार यांनी राज्यशास्त्र, भारतीय संविधान आणि राजकारण या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त नरेंद्र वानखडे यांनी केले. प्रियंका चव्हाण (वरिष्ठ लिपिक, शिक्षण विभाग) व श्रीमती ठाकरे यांनी सूत्रसंचालन केले, तर महिला व बाल विकास अधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम यांनी आभार प्रदर्शन केले. सदर कार्यक्रम यशस्वीकरण्याकरीता महिला व बाल विकास अधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.या कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला असून १००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करून सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये या कार्यशाळेबाबत समाधानाची भावना दिसून आली.अमरावती महानगरपालिकेतर्फे आयोजित ही कार्यशाळा स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी करिअरच्या मार्गाला योग्य दिशा देणारी ठरली.यावेळी ४.०० वाजेपर्यंत चालणारी कार्यशाळा विद्यार्थी च्या आग्रहाने ५.३० वाजेपर्यंत चालली.या कार्यशाळेत उपायुक्त नरेंद्र वानखडे, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, मुख्यलेखाधिकारी दत्तात्रय फिस्के, महिला व बाल विकास अधिकारी डॉ.प्रकाश मेश्राम, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तिखिले, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, क्रीडा अधिकारी प्रविण ठाकरे, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी पंकज सपकाळ, कैलास कुल्ट, महिला बाल विकास विभाग आणि स्पर्धा परीक्षा अभ्यासिका केंद्राचे अमोल साकुरे व कर्मचारी, मनपा कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चांदूर रेल्वेत गांधी जयंतीदिनी जेल भरो आंदोलन

## श्रावणबाळ, संजय गांधी निराधार व अपंग योजनेच्या रखडलेल्या मानधनाचा मुद्दा तापणार
## आम आदमी पार्टी, शिवसेना, भाकप, जनता दल, माकप, स्वा.शे. संघटनेची आक्रमक भुमिका




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ चांदूररेल्वे**

चांदूर रेल्वे तालुक्यातील श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना, अपंग योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन अनेक लाभार्थ्यांचे रखडलेले असुन त्वरीत मानधन न मिळाल्यास २ ऑक्टोबर, गांधी जयंतीदिनी जेल भरो आंदोलन करण्याचा आक्रमक इशारा आम आदमी पार्टी, शिवसेना (ठाकरे गट), भाकप, जनता दल (से.), माकप, स्वाभिमानी शेतकरी संघटना व लाभार्थ्यांतर्फे तहसिलदार यांना मंगळवारी (ता. २३) निवेदनातून दिला आहे.

चांदूर रेल्वे शहरासह तालुक्यातील संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना व अपंग व्यक्तींसाठीचे मासिक मानधन गेल्या ७-८ महिन्यांपासून खात्यावर जमा झालेले नाही. यामुळे लाभार्थ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. दैनंदिन खर्च, औषधोपचार व घरगुती जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण झाले आहे. यासंदर्भात २५ ऑगस्ट रोजी लाभार्थ्यांसह बैठा सत्याग्रह आंदोलन तहसिल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी प्रशासनाच्या विनंतीवरून सदरचे आंदोलन तात्पुरते स्थगित केले होते आणि प्रशासनाला १ ऑक्टोंबर पर्यंतचा वेळ दिला आहे. यानंतर मंगळवारी पुन्हा स्थानिक तहसिलदार यांना निवेदन देऊन लाभार्थ्यांना मानधन न मिळाल्यास २ ऑक्टोंबर (गांधी जयंती) रोजी तहसिल कार्यालयावर तिव्र आंदोलन (जेल भरो आंदोलन) करण्याचा इशारा दिला आहे. तसेच श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजनेच्या मानधनात वाढ करून २ हजार ५०० रूपये देण्यात यावे ही सुध्दा मागणी करण्यात आली आहे.निवेदन देतेवेळी आप नेते नितीन गवळी, मेहमूद हुसेन, भाकपचे विनोद जोशी, सतीश चौधरी, जनता दलचे प्रभाकर भगत, संजय डगवार, माकपचे रामदास कारमोरे, शिवसेना (ठाकरे गट)चे बंडूभाऊ यादव, गजानन यादव, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रशांत शिरभाते, यांसह महादेव शेंद्रे, भीमराव खलाटे, परसराम आगासे, अंबादास हरणे, राजाभाऊ भैसे, दिनेश आमले, विठ्ठल चौरागडे, योगेश्वर गावंडे, प्रमोद हेरोडे, चंद्रकांत गजभिये, मुरलीधर तेलंग, चंद्रमणी गजभिये यांसह अनेक लाभार्थ्यांची उपस्थिती होती.

# आरोग्याचे प्रश्न सोडविण्यासाठी समन्वयाने काम करावे

## गाभा समितीच्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५ अमरावती**

मेळघाटातील आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी केली.

गाभा समितीची बैठक दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी चिखलदरा येथील तालुका प्रशिक्षण केंद्रात पार पडली. जिल्हाधिकारी श्री. आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले आणि जिल्हा अतिरिक्त आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पारिसे आदी उपस्थित होते.

बैठकीत माता मृत्यू, बालमृत्यू आणि कुपोषण कमी करण्यावर भर देण्यात आला. अति जोखमीच्या गरोदर मातांची वेळेवर ओळख करून त्यांना आरोग्य सेवा देण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांच्या संकल्पनेतून मेळघाट आरोग्य परिक्रमा' उपक्रम राबवण्यात येत आहे. यात मेळघाटात दरमहा चार आरोग्य शिबिरे आयोजित केली जाणार आहे. यात गरोदर आणि स्तनदा माता तसेच बालकांची स्त्रीरोग आणि बालरोग तज्ज्ञांकडून तपासणी केली जात आहे. वर्षभ एकूण ५६ शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. बैठकीत अंगणवाडी, शाळा, बांधकाम, शिक्षण, शुद्ध पाणीपुरवठा, घरकुल योजना आणि टीबीमुक्त भारत यावरही चर्चा झाली.सॅम आणि मॅम बालकांच्या प्रकृतीत सुधारणा करण्यावर आणि त्यांचा पाठपुरावा करण्यावर लक्ष देण्यास सांगण्यात आले. अंगणवाडीमधील आणि स्थलांतरित लाभार्थ्यांचा पाठपुरावा करण्याचे निर्देश एकात्मिक बाल विकास विभागाला देण्यात आले, जेणेकरून कोणीही लाभापासून वंचित राहणार नाही. विद्युत समस्येबाबत वीज मंडळाला योग्य सेवा देण्याबद्दल सांगण्यात आले. तसेच, जीर्ण झालेल्या शाळांची बांधकाम पूर्ण करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

# तिवसा तालुका काँग्रेसची आढावा बैठक उत्साहात

## 'वोट चोरी स्वाक्षरी अभियानाचा' शुभारंभ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५तिवसा**

सत्यशोधक समाजाच्या स्थापना दिनाचे औचित्य साधत महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करून तिवसा येथे तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक उत्साहात पार पडली.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी आणि अमरावती जिल्हा काँग्रेसच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीस शेकडो पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली. बैठकीदरम्यान विविध ठराव मंजूर करण्यात आले.

या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक फेरबदल, निवडणूक तयारी आणि जनतेच्या प्रश्नांवर केंद्रित नियोजनावर सखोल चर्चा झाली.विधानसभा निरीक्षक धनंजय देशमुख यांनी बैठकीस मार्गदर्शन करत काँग्रेस कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन सरकारच्या अपयशांवर लक्ष केंद्रित करत जनतेच्या न्यायहक्कासाठी उभे राहण्याचे आवाहन केले.या बैठकीत वोट चोरी स्वाक्षरी अभियानाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला, ज्याअंतर्गत जनतेमध्ये जनजागृती करत निवडणुकीतील संभाव्य अनियमिततेविरोधात आवाज उठवला जाणार आहे.तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष वैभव स. वानखडे यांनी बैठकीचे समन्वयक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली.या बैठकीस जिल्हा बँकेचे संचालक सुरेशराव साबळे, जिल्हा काँग्रेस सचिव मुकुंद देशमुख, नगराध्यक्ष सौ. प्रतिभाताई गौरखडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र राऊत, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुरेशराव मेटकर, पणन महासंघ संचालिका सुनितीताई अळसपुरे, माजी अध्यक्ष सतीशभाऊ पारधी, तसेच प्रदेश व युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या बैठकीने आगामी निवडणुकांसाठी काँग्रेसच्या सज्जतेचे संकेत दिले असून, पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी हा उपक्रम मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

# पांदण रस्त्याच्या मागणीसाठी शेतकऱ्याचं टॉवरवर 'शोले' आंदोलन

## प्रशासनाविरोधात संतापाचा उद्रेक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५धामणगाव रेल्वे**



तालुक्यातील मंगरूळ शेत शिवारात शेतकरी गोपाल निचत यांनी पांदण रस्त्याच्या मागणीसाठी थेट मोबाईल टॉवरवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन सुरू केलं आहे. २०१९ पासून सतत पाठपुरावा करूनही पांदण रस्ता न मिळाल्याने अखेर त्यांनी टोकाचं पाऊल उचललं आहे.

शेतकऱ्याने सांगितले की, २०१९ पासून रस्ता मिळावा म्हणून तीन वेळा प्रशासनाकडून नोटीसा मिळाल्या, पण प्रत्यक्षात काहीच झालं नाही. शेतात येण्यासाठी आणि जाण्यासाठी रस्ताच उरलेला नाही. जोपर्यंत रस्ता मिळत नाही, तोपर्यंत टॉवरवरून खाली उतरणार नाही.या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून, नागरिक आणि पोलिसांची मोठी गर्दी टॉवरखाली जमली आहे. प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे शेतकऱ्याला असा टोकाचा मार्ग अवलंबावा लागल्याने स्थानिकांमध्येही संताप व्यक्त केला जात आहे.

# आमदार प्रताप अडसड यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**



राज्य सरकारने नुकसानग्रस्त ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची मदत करण्याचे जीआर काढले असून यापैकी १८२९ कोटी रुपये संबंधित जिल्ह्यांमध्ये पोहोचले आहे. तर उर्वरित शेतकऱ्यांना येत्या ८-१० दिवसांमध्ये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. या दिलासादायक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आमदार प्रताप अडसड यांनी भेट घेतली.

मुंबई मंत्रालय येथे कॅबिनेट बैठकीपूर्वी आमदार प्रताप अडसड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कपाशी व फळबागांच्या पिकाच्या झालेल्या नुकसानीबाबत, विद्यार्थ्यांच्या सन २०२३-२४ व २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील आचार्य पदवी (पीएचडी) विद्यार्थी, विद्यार्थिनीच्या अधिछात्रवृत्तीबाबतबार्टी, सारथी, महाज्योती, अमृत व आर्टी संस्थामार्फत जाहिरात प्रक्रिया करून सर्व नोंदणीकृत व संशोधकांना सरसकट लाभदेण्याबाबत तसेच धामणगाव रेल्वे मतदारसंघातील विविध अडचणी व विकास कामांच्या मागणी संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले.

राज्य सरकारने नुकसानग्रस्त ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची मदत करण्याचे जीआर काढले असून यापैकी १८२९ कोटी रु. संबंधित जिल्ह्यांमध्ये पोहोचले आहेत. तर उर्वरित शेतकऱ्यांना येत्या ८-१० दिवसांमध्ये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. या दिलासादायक निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आमदार प्रताप अडसड यांनी यावेळी आभार मानलेत.

# तळेगाव ठाकूरमध्ये रस्ता व पूल नसल्याने शेतकऱ्यांचा संताप

## मतदान बहिष्कार व जलसमाधी आंदोलनाचा इशारा : खा. बळवंत वानखडे यांनी केली शेतकऱ्यांसोबत चर्चा : दै.विदर्भ प्रजासत्ताकच्या बातमीची दखल

सुनील घोरमाडे



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ तळेगाव ठाकूर**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर येथे रस्ता आणि पिंगळाई नदीवरील पूल नसल्यामुळे शेतकऱ्यांचे हाल सुरू असून, या गंभीर समस्येकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी आगामी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचा आणि जलसमाधी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

गावापर्यंत पोहोचण्यासाठी कोणताही पक्का रस्ता नसल्याने शेतकरी व मजूर वर्गाला शेतावर जाण्यासाठी जीव धोक्यात घालावा लागत आहे. परिस्थितीची दखल घेत स्थानिक शेतकऱ्यांनी स्वखर्चातून रस्त्यावर मुरूम टाकण्याचा प्रयत्न केला, मात्र वनविभागाने त्यासाठी परवानगी नाकारल्यामुळे नाईलाजास्तव काम थांबवावे लागले.

या भागातील काही रस्ता झचत्रृडध/उचत्रृडध योजनेंतर्गत विकसित झाला असला तरी उर्वरित भाग अद्याप अपूर्ण आहे. याबाबत अमरावती लोकसभा मतदारसंघाचे खासदार बळवंतराव वानखडे यांनी तळेगाव ठाकूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता श्री. जाधव यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी आणि उर्वरित कामासाठी केंद्र किंवा राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी नगरसेवक वैभव वानखडे, पंकज देशमुख, सतीश पारधी, राजेश थोरात, दिलीप वानखडे, वैभव ठाकूर, मंगेश राऊत, दादाराव घोरमाडे, किरण खवले, दिलीप बेलसरे, अतुल तिखे, विश्वजीत बाखडे आदी पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या या प्रश्नाकडे प्रशासनाने तत्काळ लक्ष देऊन ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.


विदर्भ प्रजासत्ताक
तळेगाव ठाकूर येथील सार्सी रस्ता व पिंगळाई नदीवरील पूलाची समस्या केव्हा दूर होईल हो साहेब?
शेतकऱ्यांनी स्वखर्चातून व मेहनत करून रस्ता केला : समस्या दूर झाल्या नाहीत शेतकऱ्यांचा जलसमाधी घेण्याचा इशारा
सुनील घोरमाडे

### दैनिक विदर्भ प्रजासत्ताक च्या वृत्ताची दखल

तळेगाव ठाकूरमध्ये रस्ता व पूल नसल्याने शेतकऱ्यांचा संताप; मतदान बहिष्कार व जलसमाधी आंदोलनाचा इशारा चे वृत्त दैनिक विदर्भ प्रजासत्ताक मध्ये सर्वात प्रथम दि.२२ सोमवार रोजी प्रकाशित होताच सार्वजनिक बांधकाम विभाग,महसूल सह राजकीय मंडळी ने या वृत्ताची दखल घेतली त्यानंतर अमरावती जिल्याचे खा. बळवंत वानखडे यांनी गुरुवारी गावात पोहचत थेट शेतकऱ्यांसोबत चर्चा केली त्यानंतर ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता जाधव यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी आणि उर्वरित कामासाठी केंद्र किंवा राज्य सरकारकडून निधी उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या मात्र या सुचनांचे पालन अधिकारी वर्ग करतात कि नाही याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# राहुल नगरात महिलेचा गळा दाबून निर्घृण खून? पती फरार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

अमरावती शहरातील राहुल नगर परिसरात एका महिलेचा गळा आवळून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सविता सुभाष वानखडे (वय ४०) या महिलेचा खून तिच्याच राहत्या घरी झाल्याचा पोलिसांना संशय असून, या प्रकरणात तिचा पती सुभाष वानखडे फरार आहे.

गुरुवारी (२५ सप्टेंबर) सकाळच्या सुमारास शेजारी राहणाऱ्या एक महिला काही कामानिमित्त सविताच्या घरी गेल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घरात प्रवेश करताच सविता मृतावस्थेत आढळून आली. तिच्या गळ्यावर गळा आवळल्याचे स्पष्ट खुणा दिसून आल्याने पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवला आहे.




पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, सविता मंगळवारी काही कामासाठी बाहेर गेली होती आणि ती बुधवारी घरी परतली होती. त्यानंतर सविता आणि सुभाष यांच्यात वाद झाला. हा वाद इतका टोकाचा गेला की सुभाषने सविताचा गळा दाबून तिचा जीव घेतल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.खून केल्यानंतर सुभाष घरातून फरार झाला आहे. तो एका हॉटेलमध्ये वेटर म्हणून काम करत होता, तर सविता घरकाम करून उदरनिर्वाह करत होती.घटनास्थळी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याचे अधिकारी आणि फॉरेन्सिक पथक दाखल झाले असून, घराची झडती घेण्यात आली आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत.पोलिसांनी सुभाषचा शोध सुरू केला असून, तो लवकरच अटकेत येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या खूनामुळे परिसरात खळबळ उडाली आहे.


# अमरावती सह राज्यात 'ई-बाइक टॅक्सी' धावणार;प्रवास स्वस्त अन् झटपट होणार

## रिक्षांच्या अतिरिक्त भाडेवाढीलासुद्धा निर्णयामुळे बसणार चाप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

एक लाखाहून अधिक लोकसंख्येच्या सर्व शहरांत इलेक्ट्रिक बाइक टॅक्सी सेवा सुरू करण्यास राज्य सरकारने एप्रिलमध्ये मान्यता दिली होती. त्यानुसार परिवहन विभागाने मंजुरीही दिली आहे. यामुळे प्रवाशांना स्वस्त, सोयिस्कर व पर्यावरणपूरक प्रवासाची सुविधा मिळेल. याचा लाभ अनेक प्रवाशांना होणार असून, रिक्षांच्या अतिरिक्त भाडेवाढीला, तसेच मनमर्जीलासुद्धा चाप बसणार आहे.

इलेक्ट्रिक बाइक टॅक्सी सेवा सुरू करण्यासाठी प्रायव्हेट लिमिटेड संस्थांना तात्पुरते परवाने देण्यात येणार आहेत. सर्व अटींची पूर्तता झाल्यानंतर पक्के परवाने प्रदान करण्याच्या अंतिम मान्यतेसाठी परिवहन प्राधिकरणासमोर अर्ज सादर करण्याचे निर्देश दिले असल्याचे अधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले. अर्ज आल्यानंतर मंजुरी देण्यात येणार आहे.परवान्यासाठी अर्ज करणाऱ्या ॲग्रिगेटर्सकडे किमान ५० ई-बाइक असणे आवश्यक आहे. दरम्यान, या निर्णयास काही ठिकाणी ऑटोचालक व टॅक्सीचालकांकडून मोठा विरोध होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



### ...अशी आहे भाडे रचना

ई-बाइक टॅक्सीचा पहिला टप्पा १.५ किमीचा असेल, त्यासाठी १५ रुपये भाडे, तर त्यापुढील प्रतिकिमीसाठी १०.२७ रुपये आकारले जातील. याचा लाभ अनेक प्रवाशांना होणार आहे. तसेच रिक्षांच्या अतिरिक्त भाडेवाढीलासुद्धा बंधने येणार आहेत. मात्र, या निर्णयामुळे ऑटोचालक रिक्षाचालकांना फटका बसणार असल्याने ते या निर्णयाला विरोध होण्याची शक्यता आहे.

# उपोषण मागे घेतले पण आत्मदहनाचा इशारा कायम

## २६ सप्टेंबरला तहसील कार्यालयात निर्णायक बैठक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६वरुड**

आक्रोश जनशक्ती संघटनेचे अध्यक्ष सुशिल बेले यांनी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर मागे घेतले असले तरी आत्मदहनाचा इशारा कायम ठेवला आहे. मागण्या निकाली न लागल्यास टोकाचे पाऊल उचलावे लागेल आणि मला आत्मदहनासारखा निर्णय घ्यावा लागला तरी मागे हटणार नाही, असे जाहीर वक्तव्य करत सुशिल बेले यांनी प्रशासनाला धोक्याची घंटा दाखवली आहे.या पार्श्वभूमीवर तहसीलदार वरूड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना २६ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता तहसील कार्यालयात चर्चेसाठी हजर राहण्याचे आदेश काढले आहेत. बैठकीत नगर परिषद मुख्याधिकारी, पंचायत समिती गटविकास अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता, वनसंरक्षक मोर्शी, कृषी अधिकारी, महावितरण उपअभियंता,



जमीन अभिलेख उपअधीक्षक व पुरवठा निरीक्षक अधिकारी यांची उपस्थिती निश्चित करण्यात आली आहे.सुशिल बेले यांनी या बैठकीसाठी नागरिक, कार्यकर्ते व सर्व समर्थकांना भक्कम उपस्थिती दाखवा असे आवाहन केले आहे. आंदोलनाच्या पहिल्याच टप्प्यात प्रशासनाला नमविण्यात यश आले, मात्र बैठकीत ठोस निर्णय झाले नाहीत, तर संघर्ष अधिक तीव्र होणार असल्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.२६ सप्टेंबरची बैठक हा प्रश्न निकाली लावणारा टप्पा ठरणार की आंदोलन आणखी भडकणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नवरात्रीत शौर्य जागर! अमरावतीत 'आता फक्त लढायचे' उपक्रमांतर्गत शौर्य प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

हिंदु जनजागृती समितीच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त 'आता फक्त लढायचे' हा शौर्य जागृती उपक्रम महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटकात राबवला जात आहे. याच उपक्रमांतर्गत अमरावतीतील राठीज एज्युकेशन हब, रवी नगर येथे युवक-युवतींसाठी विशेष स्वरक्षण प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सायंकालीन शिबिरांमध्ये लाठी, दंड साखळी (नानचाकू) यांसारख्या शस्त्रांचे प्राथमिक प्रशिक्षण, विविध स्वरक्षण तंत्र आणि आत्मविश्वास वाढवणाऱ्या कृती शिकवल्या जात आहेत. याशिवाय, नवरात्रीच्या प्रत्येक दिवशी देवीच्या शौर्यगाथा आणि हिंदू धर्मशिक्षणाचे मार्गदर्शन दिले जात आहे.हिंदु जनजागृती समितीचे सह-समन्वयक श्री. सचिन वैद्य यांनी युवक-युवतींनी या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. या उपक्रमाला अखिल भारतीय मारवाडी युवा मंच व राठीज एज्युकेशन हब यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.उपक्रमाचा उद्देश केवळ स्वरक्षण नव्हे, तर धर्माचरण, शौर्य आणि आत्मसन्मान जागवून समाज व राष्ट्र रक्षणासाठी सज्ज होणे हा आहे.

# संचमान्यतेच्या मुदतीत वाढ द्या; प्राथमिक शिक्षक समितीची शासनाकडे आग्रही मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती**

U-DISE Plus आधारित २०२५-२६ शैक्षणिक वर्षासाठी शाळा संचमान्यता प्रक्रियेची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२५ असून, अद्यापही राज्यातील अनेक शाळांना आवश्यक तांत्रिक सुविधा व SO2, SO3 सेवा उपलब्ध नसल्याने ही प्रक्रिया पूर्ण करण्यात अडथळे येत आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शासनाकडे संचमान्यतेची अंतिम मुदत वाढवावी अशी आग्रही मागणी केली आहे.समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांच्या नेतृत्वाखाली शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग, शालेय उपसचिव तुषार महाजन, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांचा समावेश आहे, अशी माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली.शासनाच्या आदेशानुसार, आधार कार्ड सत्यापनासह U-DISE Plus प्रणालीवर आधारित संचमान्यता ३० सप्टेंबरपूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु, इयत्ता दुसरीपासून वयानुरूप दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या डज२ आणि डज३ सुविधा बहुतांश शाळांमध्ये अद्याप उपलब्ध नाहीत. गट साधन केंद्रांवरही ह्या सुविधा कार्यरत झालेल्या नाहीत, त्यामुळे विद्यार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया खोळंबली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांत मागील काही दिवसांपासून अतिवृष्टीमुळे वीज व इंटरनेट सेवा खंडित झाली आहे, परिणामी अनेक शाळांचे काम ठप्प झाले आहे.समितीने शासनाला सुचवले आहे की, या तांत्रिक व नैसर्गिक अडचणींचा विचार करून संचमान्यतेसाठीची अंतिम मुदत वाढवावी तसेच आवश्यक सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात.

या मागणीसाठी राज्यातील विविध नेत्यांनी एकत्र येत आपला पाठिंबा दर्शवला. त्यामध्ये उदय शिंदे, विजयकुमार पंडित, महादेव पाटील माळवदकर, राजन सावंत, आनंदा कांदळकर, विलास कंटेकुरे, सयाजी पाटील, नंदकुमार होळकर, राजेंद्र खेडकर, सुरेश पाटील, किशोर पाटील, सतिश सांगळे, किशन बिरादार, नितीन नवले, पंडित नागरगोजे, वर्षाताई केनवडे, सुधाकर सावंत, प्रफुल्ल पुंडकर, सैय्यद शफीक अली यांचा समावेश आहे.

# अतिवृष्टीने पीक झाले उद्ध्वस्त, शिवसेनेचा शेतकऱ्यांसह तहसील कार्यालयावर मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नांदगाव खंडेश्वर**

तालुक्यात गेल्या दोन आठवड्यांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतजमिनी जलमय झाल्या असून, सोयाबीन, कापूस व तूर पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर नुकसान भरपाई व पिक विम्याच्या मदतीसाठी शिवसेना (ठाकरे गट) ने शेतकऱ्यांसह तहसील कार्यालयावर धडक मोर्चा काढत सरकारविरोधात जोरदार घोषणा दिल्या.शिवसेनेचे प्रकाश मारोटकर, जिल्हाप्रमुख मनोज कडू, बाळासाहेब राणे यांच्या नेतृत्वाखाली शेकडो शेतकरी तहसील कार्यालयावर जमले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुर्दाबाद अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. शासनाने पंचनाम्याचे आदेश दिलेले असतानाही तालुक्यात अद्याप पंचनाम्यांची सुरुवात झालेली नाही. तलाठ्यांकडून तहसीलदारांचा लेखी आदेश नसल्याने पंचनामे होत नसल्याचे सांगितले जात आहे.शिवसेनेने शेतकऱ्यांच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देत तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. सन २०२४ चा खरीप हंगाम पिक विमा मंजूर असून देखील शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा झालेली नाही. मे महिन्यातील अवकाळी पावसाच्या मदतीसाठी घधउ करूनही अनेक शेतकऱ्यांना अनुदान मिळालेले नाही. शिवाय, अवकाळी पावसाच्या यादीतून अनेकांचे नावे वगळण्यात आली असून त्यांनाही भरपाई मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.तसेच, निराधार योजनेतून सहा महिन्यांपासून लाभार्थ्यांना मदतीची रक्कम मिळालेली नाही. शिवसेनेने याबाबत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला. यावेळी अनेक स्थानिक पदाधिकारी व शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# येवदा येथील प्रा.आ.केंद्र वडनेरगंगाई येथे मंजूर; खासदार डॉ.अनिल बोंडेचा येवदा भागात विकास कामांचा धडाका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५दर्यापूर**

राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी तालुक्यातील येवदा भागात विकास कामांचा मोठा धडाका लावला आहे. येवदा येथे आधी शासनाकडून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करून घेतले, त्यानंतर आता येवद्याचे प्राथमिक आरोग्य केंद्र थेट वडनेर गंगाईला स्थलांतरित करून आरोग्य सेवा बळकट करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांनी यासंदर्भातील आदेश तातडीने जाहीर केला आहे.

दर्यापूर तालुक्यातील सर्वात मोठे गाव असलेल्या येवदा येथील आरोग्य सेवा बळकटी करण्यासाठी येथे तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय मंजूर करावे, अशी मागणी भाजपच्या अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष नकुल सोनटक्के यांनी खासदार डॉ.अनिल बोंडे यांच्याकडे केली होती. त्यानंतर स्वतः डॉ.बोंडे यांनी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेत रुग्णालय मंजूर करून घेतले. शिवाय, रुग्णालय निर्माण, इमारत बांधकाम, मनुष्यबळ भरती यासंदर्भातील संपूर्ण प्रक्रिया देखील पूर्ण करून अंतिम मंजुरीसाठी शासनाकडे पाठवण्यात आली आहे. कोणताही क्षणी येवदा येथे पूर्ण



क्षमतेने ग्रामीण रुग्णालय संचलित केले जाणार आहे. येवद्याच्या आरोग्य सेवेचा प्रश्न मिटल्यानंतर आता येथील प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेरगंगाई येथे स्थलांतरित करण्याची मागणी देखील नकुल सोनटक्के यांनी केली होती. त्यासाठी सुद्धा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी शासनाकडे पाठपुरावा करत होता वडनेरगंगाई येथे पीचसी निर्माणाचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी वडनेरगंगाई येथे प्राथमिक आरोग्य केंद्र स्थलांतरणासंदर्भातील आदेश तातडीने जारी केला आहे. त्यामुळे येवदा व वडनेर गंगाई या भागातील आरोग्य सेवा अधिक मजबूत होणार आहेत. एकंदरीतच आधी ग्रामीण रुग्णालय येवद्यासाठी मंजूर झाले. त्यानंतर आता वडनेर गंगाई येथे भव्य, प्रशस्त, प्राथमिक आरोग्य केंद्राचे निर्माण होणार आहे. यासाठी परिसरातील नागरिकांनी खासदार डॉ.अनिल बोंडे यांचे आभार मानले आहेत.

!! Shree Gajanana Maharaj Prasanna !!

**P. R. Patil College of Education (B.Ed.) , Amravati**

Pote Estate, Pote Patil Road, Kathora, Amravati

(Approved by NCTE, New Delhi & Affiliated to SGBAU, Amravati)

**Contact no. – (0721) 2970465**

**E-mail – prpatil.bed@gmail.com, Website - www.prpotepatilbed.com**

**Applications are invited for admissions at Institute Level Quota & Against CAP Seats for B.Ed. Course First year 2025-26**

BACHELOR OF EDUCATION (B.ED.) 2025-26

NOTE :- Admission Schedule is displayed on our Notice Board.

Principal

# नवरात्रीचे नवरंग...............

## नवरात्रीचा आजचा चवथा दिवस; आजचा रंग पिवळा




पिवळ्या रंगात सजलेल्या महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिकांनी भारतीय संस्कृती आणि परंपरेच्या जपणुकीचा संदेश दिला.

# अंबादेवी,एकविरा देवी सह अन्य प्रमुख मंदिरांत कडक सुरक्षा, श्वानपथकांकडून तपासणी

## पोलिसांचा खडा पहारा : नवरात्र पर्वात भाविकांच्या सुव्यवस्थेसाठी विशेष खबरदारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

नवरात्र उत्सवाला सोमवारपासून सुरुवात झाली असून, दरवर्षीप्रमाणे यंदाही अमरावती शहरातील अंबादेवी व एकविरा देवी मंदिरात नऊ दिवस भक्तांची मोठी गर्दी होत आहे मंदिर परिसरात भाविकांची रेलचेल मोठ्या प्रमाणात वाढली असल्याने देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांमध्ये उत्साहासोबतच भक्तिभावाचे वातावरण असल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अमरावती शहर पोलिस प्रशासनाने काटेकोर बंदोबस्त ठेवला आहे. परिसरात कुठलीही अप्रिय घटना घडू नये, यासाठी प्रशासकीय स्तरावर दक्षता बाळगली जात आहे. एकंदरीतच अमरावती शहर पोलिस पथक सज्ज झाल्याचे दिसून येत आहे.



या दरम्यान बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या मदतीने मंदिर परिसराची सखोल तपासणी दररोज करण्यात येते तर मंदिर परिसरात काटेकोर बंदोबस्त करण्यात आला आहे.

यावेळी कर्तव्य बजावणाऱ्या पथकासोबत 'किंग' या श्वानाचा देखील सहयोग घेण्यात आला. संशयास्पद वस्तू व हालचालींवर लक्ष ठेवत श्वान पथकाने मंदिराच्या प्रत्येक कोपऱ्यात तपासणी केली.

भाविकांना कोणतीही अडचण होऊ नये व सुरक्षित वातावरण निर्माण व्हावे यासाठी पोलिसांची उपस्थिती दिवसरात्र कायम ठेवण्यात आली आहे. नवरात्राची उत्साही, सांस्कृतिक आणि धार्मिक छटा

एकीकडे भाविकांमध्ये आनंद व भक्तिभाव ओतप्रोत भरत असताना, दुसरीकडे पोलिसांचा दक्ष निगराणीचा दृष्टिकोन नागरिकांमध्ये सुरक्षिततेचा विश्वास निर्माण करतो. मंदिर परिसरासह शहरातील गांधी चौक,राजकमल चौक हे प्रमुख मार्ग, गर्दीचे ठिकाणे आणि उत्सव स्थळांवरही पोलिसांनी नजर ठेवली आहे नवरात्रोत्सव सुरळीत त निर्विघ्नपणे पार पहावा, यासाठी पोलिस विभागाने उत्कृष्ट नियोजन केले आहे.

